रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १८ ◆ अंक ३५
www.ramprahar.com
# राम प्रहर
गुरुवार, २१ ऑगस्ट २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

अंतरंग
रायगडात सहा दिवसांनंतर वरूणराजाची विश्रांती/२
पनवेल परिसरात चोरींच्या घटनांमध्ये वाढ/३
श्रीवर्धन तालुक्यात विजेचा खेळखंडोबा/७

## राज्यातील पोलीस भरतीचा शासन निर्णय जारी



**मुंबई :** राज्य सरकारने नुकतेच राज्यात एकूण १५ हजार ६३१ पदांसाठी पोलीस भरती होणार असल्याचे जाहीर केले होते. या भरतीबाबतचा शासन निर्णय जारी केला आहे. मिळालेल्या माहितीनुसार पोलीसदलातील पदे शंभर टक्के भरण्यात येणार आहेत. या निर्णयाअंतर्गत आता जानेवारी २०२४ पासूनची रिक्त पदे भरली जाणार आहेत. पोलीस शिपाई पदासाठी १२ हजार ३९९ जागांची भरती होणार आहे. तर पोलीस शिपाई चालक पदाच्या एकूण २३४ जागा भरल्या जाणार आहेत. बॅण्ड्समन पदाच्या एकूण २५ जागा भरल्या जाणार आहेत. तर सशस्त्र पोलीस शिपाई पदाच्या एकूण दोन हजार ३९३ जागांसाठी ही भरती प्रक्रिया राबवली जाणार आहे. कारागृह शिपाई पदाच्या एकूण ५८० जागांसाठी भरती प्रक्रिया राबवली जाणार आहे.

# सलग ३० दिवस तुरुंगात असलेल्या लोकप्रतिनिधीला द्यावा लागणार राजीनामा

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी बुधवारी (दि.२०) लोकसभेत तीन महत्त्वाची विधेयके मांडली. गंभीर गुन्हेगारी आरोपांमध्ये अटक झाल्यास किंवा ताब्यात घेतल्यास पंतप्रधानांपासून ते राज्यांचे मुख्यमंत्री, मंत्री आणि जम्मू आणि काश्मीरसह केंद्रशासित प्रदेशांच्या मंत्र्यांना पदच्युत करण्याची तरतूद या विधेयकांद्वारे केली आहे. विधेयकातील प्रस्तावित तरतुदींनुसार, जर एखादा मंत्री गंभीर गुन्ह्याच्या (पाच वर्षे किंवा त्याहून अधिक शिक्षेचे गुन्हे) प्रकरणात सलग ३० दिवस तुरुंगात असेल तर राष्ट्रपती पंतप्रधानांच्या सल्ल्यानुसार त्याला पदावरून काढून टाकू शकतील.



केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी लोकसभेत विधेयके मांडल्यानंतर विरोधकांनी त्यावर आक्षेप घेत गदारोळ केला. अमित शाह यांनी संविधान (१३० वी दुरूस्ती) विधेयक, जम्मू आणि काश्मीर पुनर्रचना (दुरुस्ती) विधेयक आणि केंद्रशासित प्रदेश सरकार (दुरुस्ती) विधेयके मांडली. ही तीन विधेयके सादर केल्यानंतर ती विचारार्थ संयुक्त संसदीय समितीकडे पाठविण्याचाही उल्लेख अमित शाह यांनी केला.

एखादा मंत्री पदावर असताना सलग तीस दिवसांपर्यंत, पाच वर्षे किंवा त्याहून अधिक काळाच्या कारवासाची शिक्षा असलेल्या कोणत्याही कायद्याअंतर्गत गुन्हा केल्याच्या आरोपावरून अटक किंवा कोठडीत असेल, तर अशा मंत्र्याला पंतप्रधानांच्या सल्ल्यानुसार राष्ट्रपती त्याच्या पदावरून काढून टाकतील.

### केंद्रीय गृहमंत्र्यांची लोकसभेत तीन महत्त्वाची विधेयके

विधेयकाच्या प्रतीमध्ये पुढे म्हटले आहे की, पंतप्रधानांनी जरी अशा मंत्र्याला काढून टाकण्याचा सल्ला राष्ट्रपतींना सादर केला नाही तरी संबंधित मंत्र्याला एकतिसाव्या दिवसापासून मंत्री पदावर राहता येणार नाही.

**काय आहेत नवीन विधेयके?**

**१.संविधान (१३० वी घटनादुरुस्ती) विधेयक:** यानुसार, पंतप्रधान जर पाच वर्षे किंवा अधिक शिक्षेच्या गुन्ह्यात सलग ३० दिवस अटकेत असतील, तर त्यांना ३१ व्या दिवशी राजीनामा सादर करावा लागेल. जर त्यांनी राजीनामा दिला नाही, तर त्यानंतरच्या दिवसापासून ते पंतप्रधान पदावर राहणार नाहीत, असे विधेयकात स्पष्ट म्हटले आहे.

**२. केंद्रशासित प्रदेश सरकार (दुरुस्ती) विधेयक:** २०२५ आणि जम्मू-काश्मीर पुनर्रचना (दुरुस्ती) कायदा, २०२५: राज्यांप्रमाणेच केंद्रशासित प्रदेशांच्या मुख्यमंत्र्यांनाही हेच नियम लागू होतील.

**३. केंद्रीय आणि राज्य मंत्रिमंडळातील मंत्री:** केंद्र आणि राज्यांमधील मंत्र्यांनाही हेच नियम बंधनकारक असतील. केंद्रीय मंत्र्यांना पंतप्रधानांच्या सल्ल्यानुसार राष्ट्रपती पदावरून दूर करतील, तर राज्यांमधील मंत्र्यांना मुख्यमंत्र्यांच्या सल्ल्यानुसार राज्यपाल पदावरून हटवतील.

# नवी मुंबई विमानतळाचे नामकरण लोकनेते ‘दिबां’च्याच नावाने होणार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दि. बा. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळ असे नाव देण्यासाठी उभारण्यात आलेल्या चळवळीबाबत काही अनावश्यक आक्षेप नोंदवले जात आहेत.

या संदर्भात ठाम विश्वास आहे की केंद्र सरकार विमानतळ सुरू होण्यापूर्वीच नामकरणाचा निर्णय घेईल. या चळवळीला केंद्र सरकारकडून नेहमीच सकारात्मक प्रतिसाद मिळाला आहे आणि स्थानिकांची भावना सन्मानाने मान्य केली जाईल.





हेही लक्षात ठेवले पाहिजे की, आज आक्षेप घेणारे लोक त्यावेळी आंदोलनाला पाठिंबा देत नव्हते, जेव्हा तत्कालीन महाविकास आघाडी सरकारने या नामकरण चळवळीला मारक ठरणारा निर्णय घेण्याचा प्रयत्न केला होता. त्या काळात ते मौन बाळगत होते, हे सर्व जनतेला माहीत आहे.

याशिवाय, या संदर्भातील समितीचे अध्यक्ष हे तटस्थ असणे अपेक्षित असताना त्यांनी २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत आमदार महेश बालदी यांच्या विरोधात भूमिका घेतली होती. आमदार महेश बालदी यांनी या नामकरणासाठी झालेल्या सर्व आंदोलने उर्जेने पुढे नेली, अगदी त्यासाठी त्यांना खटलेसुद्धा भोगावे लागले. अशा व्यक्तीच्या प्रयत्नांना नाकारणे आणि त्यांच्या विरोधात भूमिका घेणे हा सरळसरळ राजकीय हेतू आहे.

> *लोकनेते दि. बा. पाटील यांचे योगदान आणि जनतेची भावना लक्षात घेऊन हे विमानतळ त्यांच्याच नावाने होणार, यात कोणतीही शंका नाही. हे नामकरण केवळ एका पक्षाचे वा नेत्याचे नसून संपूर्ण रायगड जिल्ह्याच्या भावनांचा आणि जनतेच्या हक्कांचा विषय आहे.*
> **-प्रशांत ठाकूर, आमदार, पनवेल विधानसभा**

## एकाच कुटुंबातील पाच जणांचा शॉक लागून मृत्यू

**जळगावमधील घटना**

**जळगाव : प्रतिनिधी**

जळगावच्या एरंडोल तालुक्यात बुधवारी (दि.२०) पहाटे शॉक लागून एका कुटुंबातील पाच जणांचा दुर्दैवी अंत झाल्याची घटना घडली. एरंडोल तालुक्यातील वारखेडी गावात एका शेताभोवती तारेचे कुंपण घातले होते. शेतात कोणी शिरु नये म्हणून मालकाने या कुंपणात वीजेचा प्रवाह सोडला होता. या कुंपणाला स्पर्श झाल्यामुळे एकाच कुटुंबातील दोन महिला, पुरुष आणि लहान मुलांचा मृत्यू झाला.

वारखेडी गावातील एका शेतकऱ्याने आपल्या शेताचे पिके वन्यप्राण्यांपासून वाचवण्यासाठी शेताच्या भोवती लोखंडी तारांचे कुंपण घातले होते, पण दुर्दैवाने या विजेच्या प्रवाहाची कल्पना नसलेल्या मजुरांचा या कुंपणाशी संपर्क आला आणि त्यांना विजेचा धक्का बसला. घटनास्थळीच सर्वांचा मृत्यू झाला. घटनेची माहिती पोलिसांना देण्यात आली असून, पोलीस तत्काळ घटनास्थळी दाखल झाले आहेत. संपूर्ण घटनेचा पंचनामा करून पुढील तपास सुरू आहे.

दरम्यान, मुंबईतील भांडूपमध्ये रस्त्यावरती खुले असलेल्या विजेच्या तारांमुळे एका तरुणाचा दुर्दैवी मृत्यू झाला. हा प्रकार भांडूपच्या पन्नालाल कंपाऊंड परिसरात घडला. मृत्यू झालेल्याचे नाव दीपक पिल्ले असून तो फक्त १७ वर्षांचा होता.

# बोरघाटात महामार्गावर जड-अवजड वाहनांना बंदी

**रायगड : रामप्रहर वृत्त**



मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्ग (क्रमांक ४८) बोरघाट या महामार्गावर जड-अवजड वाहतुकीमुळे वारंवार होणारे अपघात रोखण्यासाठी सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून उपाययोजना म्हणून या अधिसूचनेच्या दिनांकापासून ते पुढील आदेश होईपर्यंत मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्ग (क्रमांक ४८) बोरघाट या महामार्गावर सर्व प्रकारच्या जड-अवजड वाहनांच्या वाहतूकीसाठी पूर्णत: बंद करण्याची अधिसूचना जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी जारी केली आहे.

या कालावधीकरीता रायगड जिल्हा हद्दीमधील वाहतूक सर्व प्रकारच्या जड-अवजड वाहनांच्या वाहतूकीकरीता बंद करण्याबाबत पोलीस अधीक्षक रायगड यांच्या पत्राच्या अनुषंगाने मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्ग (क्रमांक ४८) बोरघाट हा तीव्र चढउताराचा वाळणाचा रस्ता असल्याने या महामार्गावरील यापुर्वी घडलेल्या अपघातांच्या घटनांमुळे तसेच सद्यस्थितीत वारंवार होत असलेल्या अपघातांमुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवू नये म्हणून उपाययोजना व जनतेच्या सुरक्षिततेसाठी या महामार्गावरुन जड-अवजड वाहतूक पूर्णपणे बंद करणे आवश्यक असल्याबाबत जिल्हाधिकारी यांची खात्री झाली आहे.

### मुंबई-गोवा महामार्गावर गणेशोत्सवासाठीही नियम लागू

**मुंबई :** गणेशोत्सवासाठी मुर्तीचे आगमन, गौरी गणपती विसर्जन, परतीचा प्रवास आदींसाठी सार्वजनिक हितास्तव मुंबई ते गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ वर वजनक्षमता १६ टन किंवा १६ टनापेक्षा जास्त वाहनांना मोटार वाहन अधिनियम १९८८ च्या कलम १५५ मधील तरतूदीनुसार वाहतूक बंदी करण्यात आली आहे. २३ ऑगस्ट रोजी मध्यरात्री १२ वाजेपासून ते २८ ऑगस्ट रोजी रात्री ११ वाजेपर्यंत या कालावधीत जड वाहनांना वाहतूक बंदी असणार आहे. यामध्ये अवजड वाहने, ट्रक, मल्टीएक्सल, ट्रेलर, लॉरी आदी वाहनांचा समावेश आहे. **(पान २ वर..)**

## निवडक

### शनिशिंगणापूरच्या चौथऱ्यावर जाण्यास भाविकांना प्रवेशबंदी

**नगर :** शनिशिंगणापूर येथील शनिदेव मंदिरात दरवर्षी शनी अमावास्येला लाखो भाविक दर्शनासाठी दाखल होतात. देश-विदेशातून मोठ्या संख्येने शनीभक्त येथे येऊन शनिमूर्तीचे दर्शन घेतात आणि तेलाभिषेक करून मनोभावे पूजा-अर्चा करतात, मात्र यंदा अपेक्षित असलेल्या प्रचंड गर्दीच्या पार्श्वभूमीवर शनिशिंगणापूर देवस्थान प्रशासनाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. शनिअमावास्येच्या दिवशी शनिचौथऱ्यावर भाविकांना प्रवेशबंदी घालण्यात आली आहे.

### अफगाणिस्तानमध्ये भीषण आगीत ६९ जणांचा मृत्यू

**अफगाणिस्तान** : येथे एक मोटरसायकल, एक मिनी ट्रक आणि प्रवासी बस यांच्यात झालेल्या अपघातात आग लागल्याने ६९ जणांचा होरपळून मृत्यू झाला आहे. हेरात प्रांतामध्ये मंगळवारी हा अपघात झाला आहे. तिन्ही वाहने एकमेकांवर आदळली आणि हा अपघात झाला आहे. मृतांमध्ये महिला आणि लहान मुलांचादेखील समावेश आहे. हेरात प्रांताचे रेस्क्यू टीमचे प्रमुख अब्दुल जाहीर नूरजई यांनी या अपघाताची माहिती दिली आहे.

## रायगड जिल्ह्याला आजही रेड अलर्ट



- *कोकण किनारपट्टीला उंच लाटांचा इशारा*
- *मच्छिमारांना समुद्रात न जाण्याच्या सूचना*

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय राष्ट्रीय महासागर माहिती सेवा केंद्र (INCOIS)तर्फे मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, रायगड, पालघर, रत्नागिरी जिल्ह्यांला १९ ऑगस्ट रोजी सकाळी ५.३० ते २१ ऑगस्ट रोजी दुपारी २.३० पर्यंत ३.४ ते ४.४ मीटर तसेच, सिंधुदुर्ग जिल्हाला १९ ऑगस्ट रोजीपासून सायं. ५.३० ते २१ ऑगस्ट दुपारी २.३० पर्यंत २.९ ते ४.० मीटर उंच लाटांचा इशारा देण्यात आला असल्याचे राज्य आपत्कालीन कार्य केंद्राकडून कळविण्यात आले आहे.

रायगड, पुणे घाट या भागात रेड अलर्ट देण्यात आला आहे. तर नंदुरबार, नाशिक घाट, पालघर, ठाणे, मुंबई शहर, मुंबई उपनगर, सातारा घाट, रत्नागिरी, कोल्हापूर घाट या भागात ऑरेंज अलर्ट देण्यात आले आहे.

उंच लाटांचा इशारा देण्यात आलेल्या कालावधीत समुद्राची स्थिती खवळलेली व ताशी ५०-६० किमी वेगाने वारे वाहण्याची शक्यता असल्याने मच्छिमारांना समुद्रात न जाण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. समुद्राची धूप आणि उंच लाटांचे तडाखे समुद्र किनारी येण्याचा इशाराही देण्यात आला आहे. या कालावधीत संबधित जिल्हा प्रशासनाला सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या असल्याचे राज्य आपत्कालीन कार्य केंद्राकडून कळविण्यात आले आहे.

रायगड जिल्ह्यातील अंबा, सावित्री या नद्यांनी धोका पातळी पार केली आहे. तसेच रत्नागिरी जिल्ह्यातील काजळी, कोदवली नद्यांनी इशारा पातळी ओलांडली असल्याने जिल्हा प्रशासनामार्फत नागरिकांना सतर्क राहण्याची सूचना देण्यात आल्या आहेत.

## ‘बेस्ट’ निवडणुकीत ठाकरे बंधूंचा पराभव

**मुंबई : प्रतिनिधी**

दि बेस्ट एम्प्लॉईज को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीचा अकल्पनीय निकाल लागला आहे. या निवडणुकीत शशांक राव यांच्या पॅनलला १४ जागांवर विजय मिळाला असून, महायुतीच्या पॅनलला सात जागा मिळाल्या आहेत. ठाकरे बंधूंच्या युतीने या निवडणुकीत उतरवलेल्या पॅनलचा सपशेल पराभव झाला. १८ ऑगस्ट रोजी ही निवडणूक झाली होती. या निवडणुकीची मतमोजणी रात्री उशिरापर्यंत सुरू होती.

बेस्टच्या पतपेढीवर राव यांच्या बेस्ट वर्कर्स युनियनची सत्ता आली आहे. दि बेस्ट एम्प्लॉईज को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि.ची पंचवार्षिक निवडणुकीसाठी भर पावसातही कामगारांनी प्रचंड प्रतिसाद दिला. या निवडणुकीसाठी तब्बल ८३ टक्के मतदान झाले होते. ठाकरे ब्रँड आणि महायुतीसाठी ही निवडणूक प्रतिष्ठेची बनली होती.

पावसामुळे मतमोजणीला उशीर झाला होता. मंगळवारी मध्यरात्री उशीरापर्यंत मतमोजणी सुरू होती. या निवडणुकीत शशांक राव यांच्या पॅनलने दणदणीत विजय मिळवला. प्रसाद लाड यांच्या पॅनलला सात जागा मिळाल्या. ठाकरे बंधुंच्या पॅनलला एकही जागा मिळालेली नाही.

## आमदार प्रशांत ठाकूर चषक २०२५ वक्तृत्व स्पर्धेची महाअंतिम फेरी सोमवारी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका आणि कोशिश फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या आमदार प्रशांत ठाकूर चषक २०२५ वक्तृत्व स्पर्धेची महाअंतिम फेरी सोमवार २५ ऑगस्ट रोजी सकाळी ९. ३० वाजता खांदा कॉलनी येथील सीकेटी महाविद्यालयात आयोजित करण्यात आली आहे.




विद्यार्थ्यांनी निर्भीडपणे व्यक्त होण्यासाठी व्यासपीठ मिळवून देणे ही काळाची गरज होती. त्यानुसार विद्यार्थ्यांच्या नेतृत्व गुणाला प्रोत्साहन देण्यासाठी कोशिश फाउंडेशन व पनवेल महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आमदार प्रशांत ठाकूर चषक २०२५ वक्तृत्व स्पर्धेत वर्ग आणि शाळा अंतर्गत फेरीत उत्तम तयारीसह विचार मांडले. वर्ग आणि शाळा अंतर्गत फेरीत विद्यार्थ्यांनी सादर केलेले विषय अतिशय वैविध्यपूर्ण आणि महत्वपूर्ण होते. प्रत्येक भाषणात सुंदर आविष्कार दिसून आला. त्या अनुषंगाने हि वक्तृत्व स्पर्धा त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाचा एक महत्त्वाचा टप्पा ठरत आहे.

स्पर्धेत लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मीडियम स्कूल कामोठे, लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल कामोठे, चांगु काना ठाकूर विद्यालय नवीन पनवेल (इंग्रजी माध्यम), चांगु काना ठाकूर विद्यालय नवीन पनवेल (मराठी माध्यम), सुषमा पाटील विद्यालय कामोठे, लोकनेते दि. बा. पाटील विद्यालय कामोठे, रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मुर्बी, रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा खारघर, रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कोपरा, केएसए बार्न्स स्कूल, पनवेल महानगरपालिका प्राथमिक शाळा क्र. ०१ ते ११ शाळा आदी शाळांचा सहभाग मिळाला.

स्पर्धेच्या पहिल्या फेरीत एकूण १६,८८७ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला आणि ४०५ वर्गांमधून निवड झालेल्या २०२५ विद्यार्थी शाळा अंतर्गत फेरीसाठी अर्थात दुसऱ्या फेरीसाठी पात्र ठरले. यामधून पात्र ठरलेले विद्यार्थी सोमवारी होणाऱ्या महाअंतिम फेरीत आपले वक्तृत्व कौशल्य सादर करणार आहेत.

## रायगड जिल्ह्यातील २८पैकी २४ धरणे १०० टक्के भरली!

**रायगड : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्ह्यात गेली सहा दिवस मुसळधार पाऊस पडला आहे. त्यामुळे नदी- नाले तुडुंब भरून वाहत आहे. मोठ्या प्रमाणात पडलेल्या पावसामुळे धरण क्षेत्रातील पाण्याचा साठा वाढला आहे.



जिल्ह्यातील २८ धरण क्षेत्रात सरासरी ९७.५१ टक्के पाणीसाठा उपलब्ध झाला आहे. रायगड जिल्ह्यातील २८ धरणांपैकी २४ धरणे १०० टक्के म्हणजे पूर्ण क्षमतेने भरली आहेत.

त्यामुळे जिल्ह्याचा पाण्याचा प्रश्न सुटला आहे. असाच पावसाचा जोर कायम राहिल्यास जिल्ह्यातील उर्वरित धरणे लवकरात १०० टक्के म्हणजे पूर्ण क्षमतेने भरण्याच्या मार्गावर आहेत. उरण तालुक्यातील पुनाडे सर्वात कमी म्हणजे ५८ टक्के भरले आहे.

दरम्यान, हवामान विभागाने रायगड जिल्ह्याला २१ ते २४ ऑगस्टपर्यंत यलो अलर्ट दिला आहे. अंबा नदीने धोक्याची पातळी तर पाताळगंगा आणि कुंडलिका नदीने इशारा पातळी ओलांडली आहे.

## गणेशभक्तांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी आरोग्य विभाग सज्ज

**अलिबाग : प्रतिनिधी**

कोकणात जाणाऱ्या गणेशभक्तांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी आरोग्य विभाग सज्ज होत आहे. मुंबई-गोवा महामार्गावर २३ ऑगस्ट ते १० सप्टेंबरदरम्यान १० ठिकाणी आरोग्य विभागाचे पथक कार्यरत असणार आहे. जिल्हाधिकारी किशन जावळे व जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली ही पथके स्थापन करण्यात आली आहेत.

**आरोग्य पथके स्थापन करण्यात येणारी ठिकाणे**
खारपाडा (जिते), खारपाले, वाकण, कोलाड, इंदापूर, माणगाव, लोणेरे, महाड (मोपराब्रिज), महाड एमआयडीसी (टोलफाटा), पोलादपूर (लोहारमाळ)

गणेशोत्सव २७ ऑगस्ट ते ६ सप्टेंबरदरम्यान साजरा करण्यात येणार आहे. गणेशोत्सवासाठी मुंबई, ठाणे, नवी मुंबई, पालघर येथून मोठ्या प्रमाणात चाकरमानी आपापल्या गावी जाण्यासाठी मुंबई गोवा महामार्गावरून प्रवास करतात. वाढती वाहतूक लक्षात घेता अपघाताचीही शक्यता निर्माण होते तसेच प्रवाशांना केव्हाही वैद्यकीय गरज भासू शकते, हे लक्षात घेऊन आरोग्य विभाग सज्ज झाला आहे.

चाकरमानी शक्यतो २३ ऑगस्टपासून आपापल्या गावी जाण्यासाठी प्रवास करतील अशी शक्यता आहे. यामुळे २३ ऑगस्टपासून मुंबई गोवा महामार्गावर १० ठिकाणी आरोग्य पथक नेमण्यात येणार आहे. या आरोग्य पथकात दिवस रात्र एक वैद्यकीय अधिकारी, एक आरोग्य सेविका, एक आरोग्य कर्मचारी, एक वाहनचालक आवश्यक त्या प्राथमिक औषोधपचाराच्या साहित्यासह कार्यरत असणार आहे. तसेच आरोग्य पथकाला रुग्णवाहिका उपलब्ध करून दिली जाणार आहे. गणेशभक्तांना वैद्यकीय सुविधेत कोणतीही कमतरता भासणार नाही. याची खबरदारी आरोग्य विभाग घेत असल्याची माहिती, जिल्हा आरोग्य अधिकारी मनिषा विखे यांनी दिली आहे.

## विजेच्या धक्क्याने दोन जणांचा मृत्यू

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील सावेले ग्रामपंचायतीतील साळोख आदिवासी वाडीतील दिर आणि भाऊजय शेवग्याचा पाला काढण्यासाठी गेले असता शेवग्याची फांदीवर उच्च दाबाच्या वीज वाहिनीवर चिकटली. त्या विजेचा धक्का लागून दिर भाऊजयीचा मृत्यू झाला.

शेवग्याच्या झाडाच्या फांद्या काढत असताना उच्च दाबाच्या विजेच्या तारा ओल्या झाडावर चिटकलेल्या असल्या मुळे रामचंद्र वाघमारे आणि त्यांची भाऊजय सुनीता वाघमारे यांना विजेचा जबरदस्त धक्का बसला. या धक्क्याने दोघांचा जागेवर मृत्यू झाला. रामचंद्र वाघमारे मोल मजुरी करून उदरनिर्वाह करणारे मजूर होते.

## महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धेबाबत आवाहन

**मुंबई :** राज्यात साजरा होणारा गणेशोत्सव हा राज्य महोत्सव म्हणून साजरा करण्यात येणार असल्याची घोषणा राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड.आशिष शेलार यांनी केली आहे. या महोत्सवांतर्गत महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धा राज्य, जिल्हा, तालुका या तीनही स्तरावर होणार आहे. या स्पर्धेचे अर्ज पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी मुंबईच्या pldeshpandekalaacademy.org या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेल्या ganeshotsav.pldmka.co.in या पोर्टलद्वारे ऑनलाईन स्वरूपात स्वीकारले जाणार आहेत. स्पर्धेचे अर्ज स्वीकारण्याची अंतिम तारीख २५ ऑगस्ट २०२५ असून ही स्पर्धा विनामूल्य आहे. नोंदणीकृत व परवानाधारक सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ या स्पर्धेत सहभागी होऊ शकतात.

विजेत्या मंडळांना तालुकास्तरावर एक, जिल्हा व राज्यस्तरावर प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांकांनी गौरविले जाणार आहे. यासोबतच, महाराष्ट्रातील घरगुती गणपतीचे दर्शन, सार्वजनिक गणपतीचे दर्शन व विविध प्रसिद्ध गणेश मंदिरातील गणपतींचे लाईव्ह दर्शन ganeshotsav.pldmka.co.in पोर्टलद्वारे घरबसल्या घेता येणार आहे. आपल्या घरगुती अथवा सार्वजनिक गणेशोत्सवाचे छायाचित्र या पोर्टलद्वारे विनामूल्य प्रसिद्ध करता येईल. याकरिता आपल्या गणपतीची छायाचित्रे ganeshotsav.pldmka.co.in या पोर्टलद्वारे प्रसिद्ध करावी व सर्वांना श्री गणरायाचे दर्शन घेता यावे, असे आवाहन मंत्री शेलार यांनी केले आहे.

# पुराभिलेख दस्तऐवजांच्या संवर्धनास निधी कमी पडू देणार नाही : ॲड.आशिष शेलार

**पुणे: प्रतिनिधी**

पुराभिलेखांचे जतन करणे हे ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाचे कार्य असून, या कार्यास शासन निधी कमी पडू देणार नाही, असे प्रतिपादन सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी आज येथे केले. येथील पुरालेखागार कार्यालयालास आज भेट देऊन त्यांनी पुरालेखागाराच्या कामकाजाची पाहाणी केली, त्यावेळी ते बोलत होते.



पुणे पुरालेखागारात साधारणपणे चार कोटी ऐतिहासिक कागदपत्रे असून त्यात ३९,००० रूमाल आहेत. यामध्ये २९,४६३ मराठी रूमाल, ६४४ गुजराती रूमाल आणि १०,५१८ इंग्रजी फाईल्स समाविष्ट आहेत. या संग्रहामध्ये पेशवेकालीन रोजकिर्द, छत्रपती शाहू महाराज दप्तर, सातारा महाराज दप्तर, आंग्रे दप्तर, कर्नाटक दप्तर, प्रांत आजमास आणि जमाव दप्तर यासारख्या महत्त्वाच्या विभागांची कागदपत्रे आहेत.

मंत्री शेलार यांनी सांगितले की, चाळीस लाख कागदपत्रे जीर्ण स्वरूपात असून त्यांच्या संवर्धनासाठी तीस कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. कागदपत्रांवर टिश्यू पेपर लावून संरक्षण करण्याचे कामास प्रति पान ७५ रुपयांचा खर्च येतो. या व्यतिरिक्त वाळवी प्रतिबंधक धूमीकरण, आणि अन्य रासायनिक प्रक्रियांनी देखिल पुरातन कागदपत्रांचे जतन केले जाते. पुरालेखागाराच्या ऐतिहासिक इमारतीच्या जतन व संवर्धनासाठी पंधरा कोटी रुपयांचा अतिरिक्त खर्च अपेक्षित आहे. डिजिटायझेशन, मायक्रोफिल्मिंग आणि ॲसिड-फ्री बॉक्स यांसारख्या आधुनिक तंत्रांचा वापर करून कागदपत्रांचे दीर्घकालीन जतन केले जात आहे. या पुरालेखागारातून वार्षिक १२ ते १५ लाख रुपयांचा महसूल गोळा होत असून, इनाम-वतन विषयक कागदपत्रे आणि लँड लिनेशन उतारे न्यायालयीन कामकाजात पुरावा म्हणून वापरले जातात. मंत्री आशिष शेलार यांच्याकडे एकूण ४५ कोटी रुपयांच्या अनुदानाची मागणी करण्यात आहे. ॲड. आशिष शेलार यांनी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले आहे. इतिहास संशोधकांसाठी हा अमूल्य खजिना असल्याचे त्यांनी नमूद केले. परदेशी संशोधक देखील येथे अभ्यासासाठी येत असल्याचे या वेळी त्यांना सांगण्यात आले. तसेच सार्वजनिक बांधकाम विभागालाही २० कोटीचा प्लॅन तयार करा, असे निर्देश यापूर्वीच उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले आहेत.

या वेळी पुरालेखागाराच्या सहाय्यक संचालिका शैला जंगम यांच्यासह अभिलेखाधिकारी शैलेंद्र वाघ, वरीष्ठ सहाय्यक रवींद्र फडतरे, अभिलेखपाल सुनिता वाघमारे यांच्यासह पुणे पुरालेखागाराचे कर्मचारी उपस्थित होते.

# अंबा नदी पुल जोड रस्त्याच्या सखल भागात पाणीच पाणी

**पाली : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात मुसळधार पावसाचा कहर सुरू आहे. मंगळवारी (दि.१९) दुपारी वाकण पाली खोपोली राज्य महामार्गावरील पाली अंबा नदी पुलाच्या जोडरस्त्यावर सखल भागात पाणी भरल्याने दोन्ही बाजूची वाहतूक बंद झाली. परिणामी प्रवासी व वाहक चालक यांचे हाल झाले. नवीन पूल झाला पण उपयोग शून्य असल्याने प्रवाशी, स्थानिक व जनतेतून संताप व्यक्त होत आहे.



सतत सुरू असलेल्या पावसामुळे पाली पोलीस ठाणे हद्दीतील अंबा नदीवरील पाली वाकण खोपोली राज्य महामार्गावर उन्हेरे व पाली जवळ अंबा नदीची पातळी वाढली असल्याकारणाने पुलाच्या दोन्ही बाजूस मुख्य रोडवर पाणी भरले. त्यामुळे वाकण बाजूकडे व खोपोली बाजूकडे जाणारी वाहतूक बंद झाली. दोन्ही बाजूला पोलिसांनी बॅरिगेट्स टाकून वाहतूक थांबवली.

जून महिन्याच्या १९ तारखेलादेखील मुसळधार पावसामुळे पुलाच्या दोन्ही बाजूने पाणी गेल्याने या मार्गावरील वाहतूक बंद होती. वाकण पाली खोपोली राज्य महामार्ग मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गाला जोडतो. तसेच दक्षिण कोकणातून पुणे व मुंबईला मुंबई-पुणे द्रुतगतीमार्गाने जाणारे प्रवाशी व वाहने याच मार्गावरून जातात. हा मार्ग सुस्थितीत असल्यामुळे अनेक प्रवासी व वाहने याचा वापर करतात, मात्र पाली अंबा नदी पूल झाला असूनही पुलाच्या दोन्ही सखल बाजूला पाणी साचल्यामुळे प्रवासी व वाहने दोन्ही बाजूस अडकून पडतात व त्यांची गैरसोय होते.

### पूल झाला पण उपयोग शून्य

अंबा नदीवर उंच व रुंद असा मोठा पूल बांधण्यात आला आहे. या आधी अंबा नदीवरील जुना पूल हा अरुंद व उंचीने छोटा होता. तसेच त्याची क्षमतादेखील कमी होती. त्यामुळे दरवर्षी पावसाळ्यात या पुलावरून पाणी जाऊन प्रचंड प्रमाणात वाहतूक कोंडी व वाहतूक ठप्प होत होती. नवीन रुंद व उंच पूल बांधल्यामुळे ही समस्या संपुष्ठात येऊन पावसाळ्यात वाहतूक सुरळीत राहील, अशी अपेक्षा सर्वसामान्य जनतेला व प्रवाशांना होती, मात्र घडले भलतेच, नवीन मोठा व रुंद पूल झाला मात्र त्याच्या दोन्ही बाजूचा जोडरस्ता हा खाली असल्यामुळे अंबा नदीचे पाणी आता पुलावरून पाणी न जाता या दोन्ही बाजूच्या रस्त्यावरून वाहते व साचत आहे. परिणामी दोन्ही बाजूची वाहतूक ठप्प होत आहे. एमएसआरडीसी प्रशासनाने या दोन्ही बाजूला मोरी टाकणे किंवा उंच रस्ता करणे गरजेचे होते, मात्र तसे न झाल्यामुळे हकनाक प्रवास्नींव नागरिकांना त्रासाला सामोरे जावे लागत आहे.

# समुद्र खवळल्याने मासेमारी बोटी आगरदांडा किनाऱ्यावर



**मुरुड: प्रतिनिधी**

हवामानात अचानक बदल होऊन वादळी पाऊस, सोसाट्याच्या वाऱ्यामुळे व समुद्र खवळल्याने मासेमारी करिता गेलेल्या ठिक ठिकाणांच्या १५० बोटी आगरदांडा व दिघी बंदर किनारी आश्रयाला आल्या आहेत.

१ जुन ते ३१ जुलैपर्यंत मासेमारी करण्यास शासनाने बंदी असल्यामुळे सर्व बोटी किनाऱ्यावरचं होत्या.नारळी पौर्णिमा च्या दुसऱ्या दिवसांपासून मासेमारीला सुरूवात करण्यात आली, परंतु सतत पाच दिवस जोरदार वाऱ्यासह पाऊस पडत असल्यामुळे त्यात समुद्र खवळत असल्याने मासेमारी गेलेल्या बोटीतील नाखवानी व खलाशांनी आप आपल्या बोटी आगरदांडा बंदर व दिघी बंदरा जवळील समुद्रात नागर टाकून आश्रयास थांबल्या यामध्ये राजपुरी, मुरूड, एकदरा, दिघी, वेरावळ गुजरात, रत्नागिरी पाजपंढरी, हरणाई, अलिबाग वर्सोवा आदिंसह बंदर भागातील अश्या १५० बोटी किनाऱ्यावर लावल्या असुन वादळ कमी होण्याची प्रतीक्षा मच्छीमार बांधव करीत आहेत. या वादाळामुळे कोळी मच्छीमार बांधवांवर पुन्हा संकट आले आहे.

सहाय्यक मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी तथा परवाना अधिकारी अक्षय साळुंखे यांनी सांगितले की वादळी वाऱ्यासह पाऊस पडत असल्याने शासनाकडुन सावधानतेचा इशारा देण्यातआला आहे .त्यामुळे समुद्रात मासेमारी करणारे नाखवा व खलाशांनी किनाऱ्या जवळ दिसेल तिथे सुरक्षेच्या दृष्टीने आप आपल्या बोटी दिघी व आगरदांडा याठिकाणी समुद्रात नांगरण्यात आलेल्या दिसत आहेत.

या बोटी जिल्ह्यातील, तालुक्यातील राज्यातील अंदाजे १५० बोटी अश्रयाला आल्या आहेत मासेमारी बोटी पुन्हा किनाऱ्यावर आल्याने मासळी मार्केट मध्ये मासळीचा तुटवडा आल्याने मासळीचे भाव वधारले आहेत. त्यातच हवामान खात्याने शक्ती वादळाचा धोका वर्तवला असल्याने पुढे आणखीन किती दिवस वाट पाहावी लागणार याकडे सर्व मच्छिमारांचे लक्ष वेधले आहे.



# बोरघाटात कार घसरली

**खालापूर : प्रतिनिधी**

मुंबई पुणे जुन्या महामार्गावरील बोरघाटात वाळक्याच्या मोरी (टाटा पावर हाऊस टर्न) जवळ इलेक्ट्रिक कार रस्त्याच्या कडेला कलंडली. सुदैवाने कोणीही जखमी नाही.सततच्या संतत धारे मुळे तर कधी मुसळधार पावसाने महामार्गा निसरडा झाल्याने वाहने घसरुन रस्ता सोडून खोलगट भागात जाऊन थांबत आहेत. अशीच घटना बुधवारी सायंकाळी घडली सुदैवाने कोणतीही प्रकारची जीवीत झाली नाही.



**अलिबाग : आंतरराष्ट्रीय युवा दिन १२ ऑगस्ट व २० ऑगस्ट सदभावना दिन या दोन्ही कार्यक्रमाचे औचित्य साधून युवकांमध्ये एच.आय.व्ही. एड्स विषयी जनजागृती करण्याचे उद्दिष्ट समोर ठेवून महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण सोसायटी अंतर्गत जिल्हास्तरीय एड्स प्रतिबंध व नियंत्रण विभाग जिल्हा सामान्य रुग्णालय अलिबाग व मेरा युवा भारत, अलिबाग-रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने अलिबाग समुद्रकिनारा येथे आयोजित बाईक रॅली उत्स्फूर्त प्रतिसादात झाली.**

# राज्यात नवीन स्कूल व्हॅन नियमावली

**मुंबई : रामप्रहर वृत्त**

देशात सुरक्षित विद्यार्थी वाहतूकीसाठी केंद्र सरकारने स्कूल बस नियमावलीचा आधार घेऊन अद्यावत मानके अर्थात स्कूल व्हॅन नियमावली तयार केली आहे.

चारचाकी १२+१ आसनापर्यँत विद्यार्थी वाहतूक करण्यासाठी वाहनाला शालेय व्हॅनचा दर्जा देण्यात येणार आहे. वाहने इड-तख या श्रेणीतील असतील. यात चालक ओळखपत्र, आपत्कालीन निर्गमन, वाहन प्रवेश, स्टोरेज रॅक यांच्या स्पष्टतेसह आसन रचना, अग्निशमन अलार्म यंत्रणा, वाहन ट्रॅकिंग अशा आधुनिक सुरक्षा तंत्रज्ञानाचा ही समावेश आहे, असेही परिवहन मंत्री सरनाईक यांनी सांगितले. परिवहन मंत्री सरनाईक म्हणाले, स्कूल बस भाडे परवडत नसलेले पालक विद्यार्थ्यांसाठी अनेकदा अवैध रिक्षाचा पर्याय अवलंबतात. रिक्षाच्या तुलनेत व्हॅनमध्ये अधिक सुरक्षेची तरतूद आहे.

### अशी असेल स्कूल व्हॅन

- जीपीएस
- सीसीटीव्ही व डॅशबोर्डवर स्क्रीन
- अग्निशमन अलार्म प्रणाली
- दरवाजा उघडा राहिल्यास अलार्म यंत्रणा
- ताशी ४० वेगमर्यादेसह स्पीड गव्हर्नर
- पॅनिक बटण, आपत्कालीन दरवाजे
- लहान विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी पायरी
- गाडीच्या छतावर शाळेचे नाव

# रायगडात सहा दिवसांनंतर वरूणराजाची विश्रांती

**अलिबाग : प्रतिनिधी**

सलग सहा दिवस बरसल्यानंतर बुधवारी (दि. २०) पावसाने रायगड जिल्हयात विश्रांती घेतली. सलगच्या अतिवृष्टीमुळे विस्कळीत झालेले रायगड जिल्ह्यातील जनजीवन हळूहळू पूर्वपदावर येत आहे. बुधवारी सकाळी संपलेल्या २४ तासात जिल्हयात १८३.१५ मिमीच्या सरासरीने दोन हजार ९३० मिलीमीटर पाऊस बरसला. माथेरानमध्ये तब्बल ४३०.०४ मिलीमीटर पावसाची नोंद झाली.

हवामान खात्याने रायगड जिल्हयासाठी बुधवारी देखील पावसाचा रेड अलर्ट दिला होता. त्यामुळे जिल्ह्यातील शाळा, महाविद्यालयाना सुटी देण्यात आली होती. परंतु बुधवारी पावसाने उघडीप घेतली. सकाळच्या सुमारास अधून मधून पावसाच्या किरकोळ सरी बरसत होत्या. नंतर मात्र पाऊस थांबला. सकाळी अंबा, कुंडलिका आणि पाताळगंगा या प्रमुख नद्यांची पाणी पातळी इशारा पातळीच्या वर होती. पावसाचा जोर कमी होताच पाणी पातळीदेखील घसरली. सखल भागात साचलेले पाणीदेखील ओसरले. जिल्ह्यातील जनजीवन हळूहळू पूर्वपदावर आले.

पेणच्या हेटवणे धरणाचे दरवाजे उघडल्याने बाळगंगा आणि भोगावती या नद्यांचे पाणी आज सकाळी पात्राबाहेर आले होते. रस्त्यावरून पाणी वाहू लागल्याने पेणच्या पूर्व भागातील काही गावांचा संपर्क तुटला होता. अंतोरे गावात पुराचे पाणी शिरल्याने काही घरे बाधित झाली होती. दुपारी पावसाचा जोर कमी झाला. हेटवणे धरणाचे दरवाजे बंद करण्यात आल्याने येथील पूरसथिती निवळली.

चोवीस तासात पडलेला तालुकानिहाय पाऊस : अलिबाग १६६. मिमी मुरूड – ११३. , पेण – २०७ ., पनवेल, २३३. , उरण – १२७. , कर्जत –२२८., खालापूर –१९०., माथेरान – ४३८.०४ , रोहा –१४७. , सुधागड – १७९., माणगाव – १३८.०३ ,तळा – २२३. , महाड –११३. , पोलादपूर –१६८. , श्रीवर्धन – ८३., म्हसळा –१७७. एकूण – २९३०.४३ मिमी , सरासरी – १८३.१५ मिमी.

# एसटी चालकाला मारहाण

**अलिबाग :** सुडकोली रस्त्यावर एसटी चालकाला मधोमध उभी केलेली ब्रीझा गाडी बाजुला घेण्यास सांगितल्याने त्या गोष्टीचा मनात राग धरून त्याची ब्रीझा गाडी पुढे काढुन एस.टी. बसचे पुढे आडवी लावून मार्ग आडवुन एस.टी. बस थांबवून ब्रीझा चालकाने गाडी अडवुन मारहाण केली.

शासकीय कर्तव्य पार पाडण्यास अडथळा केला तसेच एस.टी. बसचा दरवाजा उघडून फिर्यादीस शिवीगाळी करुन धमकी देवुन, केबीनमध्ये येवून चालकाला हाताबुक्याने मारहाण करून शिवीगाळी केली. याबाबत रेवदंडा पोलीस ठाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोसई बाजीराव गांगूडे हे करीत आहेत.

# नवीन आधार केंदासाठी अर्ज करण्याचे आवाहन

**रायगड : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्ह्यातील नागरीकांचे नवीन आधार काढणे व आधार कार्ड वरील माहिती अद्ययावत करण्याकरीता जिल्ह्यामध्ये सद्यस्थितीत एकूण ७४ आधार संच कार्यान्वित आहेत. जिल्ह्याची लोकसंख्या व आधार केंद्रांची मागणी पाहता नवीन आधार केंद्रांची स्थापना करण्याची आवश्यकता आहे. जिल्ह्यामध्ये नव्याने ९९ आधार केंद्रांची स्थापना करण्याकरीता १५ तालुक्यांमध्ये नवीन आधार केंद्र सुरु करण्यासाठी इच्छुक पात्र असलेल्या आपले सरकार सेवा केंद्र चालकांकडून अर्ज मागविण्यात आले आहेत.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या https://raigad.gov.in या संकेतस्थळावर अर्जाचा नमूना, पात्रतेचे निकष ही माहिती उपलब्ध आहे. इच्छुकांनी विहीत कागदपत्रासह आपले अर्ज जिल्हाधिकारी कार्यालयातील नोंदणी शाखामध्ये दि. २१ ऑगस्ट ते दि. ०८ सप्टेंबर या कालावधीमध्ये सायंकाळी ६.१५ वाजेपर्यंत जमा करावेत.

**रायगड जिल्ह्यातील रिक्त केंद्रांची महसूल मंडळ निहाय एकूण माहिती खालीलप्रमाणे-**

अलिबाग तालुका-किहीम, रामराज, सारळ, चरी, नागाव, कामार्ले, पोयनाड महसूल मंडळ :- एकूण-८,

कर्जत तालुका- कशेळे, कडाव, कळंब, किरवली, पाथरज- महसूल मंडळ एकूण-८,

खालापूर तालुका वावोशी, चौक, खालापूर, वासांबे- महसूल मंडळ एकूण-६,

महाड तालुका महाड बिरवाडी, तुडौल, नाते, करंजाडी, खरवली, गोंडाळे, मांघरुण, शिरगांव महसूल मंडळ एकूण-१६,

माणगांव तालुका -,माणगांव, गोरेगांव, निजामपूर, लोणेरे, इंदापूर, मोर्चा, विळे महसूल मंडळ एकूण-१०,

म्हसळा तालुका म्हसळा खामगांव, मंदडी- महसूल मंडळ एकूण-५,

तालुका मुरुड-बोर्ली, मुरुड, नांदगांव - महसूल मंडळ एकूण-३,

तालुका पनवेल शहरी-ओवळे, पळस्पे, तळोजा, महसूल मंडळ एकूण-३, पनवेल ग्रामीण- पोयंजे, मोर्बे, कर्नाळा, नेरे महसूल मंडळ एकूण-६,

पेण तालुकाहमरापूर, वाशी, कासु, कामार्ली- महसूल मंडळ एकूण-७

पोलादपूर-पोलादपूर कोंढवी, वाकण- महसूल मंडळ एकूण-५

रोहा-रोहा, कोलाड, चणेरा, घोसाळे, निडी त.अष्टमी, आंबेवाडी- महसूल मंडळ एकूण-८,

श्रीवर्धन-श्रीवर्धन, वाळवटी महसूल मंडळ एकूण-३,

सुधागड- पाली, नांदगांव, जांभूळपाडा, महसूल मंडळ एकूण-७,

तळा-मांदाड, सोनसडे- महसूल मंडळ एकूण-४ असे एकूण ९९ आधार केंद्र आहेत.

पान १ वरुन

## गणेशोत्सवादरम्यान मुंबई-गोवा महामार्गासाठी नियम

तसेच ५ व ७ दिवसांच्या गणपतीचे विसर्जन, गौरी गणपती विसर्जन आणि परतीच्या प्रवासासाठी ३१ ऑगस्ट आणि २ सप्टेंबर रोजी सकाळी ८ वाजेपासून रात्री ११ वाजेपर्यंत, अनंत चतुर्दशी ११ दिवसांचे गणपती विसर्जन, परतीचा प्रवासाकरिता ६ सप्टेंबर रोजी सकाळी ८ वाजेपासून ते ७ सप्टेंबर २०२५ रोजी रात्री ८ वाजेपर्यंत या कालावधीत जड वाहतूकीस बंदी राहील.

महामार्गावर बंदी असलेल्या कालावधी व्यतिरिक्त उर्वरित कालावधीत ज्यांची वजन क्षमता १६ टन किंवा १६ टनांपेक्षा जास्त आहे, अशा वाहनांना २८ ऑगस्ट रोजी रात्री ११ वाजेपासून ते ३१ ऑगस्ट रोजी सकाळी ८ वाजेपर्यंत, ३१ ऑगस्ट रोजी रात्री ११ वाजेपासून ते २ सप्टेंबर रोजी सकाळी ८ वाजेपर्यंत आणि सप्टेंबर रोजी रात्री ११ वाजेपासून ते ६ सप्टेंबर रोजी सकाळी ८ वाजेपर्यंत वाहतूकीस परवानगी राहील. तसेच सर्व वाहनांना ७ सप्टेंबर रोजी रात्री ८ वाजेनंतर नियमित वाहतूकीस परवानगी असेल.

जेएनपीटी व जयगड बंदरातून आयात - निर्यात मालाची वाहतूक सुरू राहील, याकरिता वाहतुकीचे नियोजन करण्यात यावे, असे सहसचिव राजेंद्र होळकर यांनी आदेशात नमूद आहे.

# वनमंत्र्यांची सिडको अधिकाऱ्यांना तंबी; 'पार्किंगची जागा बळकावू नका'

**नवी मुंबई : बातमीदार**

सानपाडा सेक्टर ३ येथील स्नेहाबंधन सोसायटी, निवारा सोसायटी, हेमगिरी सोसायटी या ठिकाणी सिडकोकडून मोकळ्या जागा ताब्यात घेण्याचा प्रयत्न सुरू आहे. या जागा सिडकोने १९९४ साली पार्किंगसाठी दिल्या होत्या. या जागांवर नागरिकांकडून वाहने पार्क केली जातात.मात्र काही कंत्राटदारांकडून येथे येऊन जागा रिकामा करण्याच्या सूचना करण्यात आल्या. त्यामुळे नागरिकांनी संताप व्यक्त केला असून, यांबाबत नागरिकांनी थेट वनमंत्री गणेश नाईक यांच्या जनता दरबारात जाऊन भेट घेतली. त्यावेळी त्यांनी तातडीने सिडको अधिकाऱ्यांना कोणत्याही जागा थेट ताब्यात घेऊ नका अशी तंबी दिली.

भाजपाचे गणेश कमळे यांनी माहिती देताना सांगितले की, आम्हाला सिडकोने पार्किंगसाठी जागा दिल्या आहेत. पार्किंग जागा ताब्यात घेण्यासाठी काही अधिकारी गेल्या आठवड्यात येऊन गेले.पार्किंगची जागा रिकामी करा अशी सुचना बजावली, त्यानंतर तात्काळ आम्ही वनमंत्री व पालघर पालकमंत्री गणेशजी नाईक यांची भेट घेतली. तुम्ही सोसायटीचे सदस्य यावेळी उपस्थित होते. या सदस्यांनी सोसायटींचे निवेदन वनमंत्र्यांना दिले. वनमंत्री नाईक यांनी तातडीने उपस्थित सिडको अधिकाऱ्यांना बजावले, की सेक्टर ३ या ठिकाणी कोणत्याही सक्ती करू नका. सिड़कोमार्फत पार्किंगची जागा बळकावणे किंवा कुंपण घालण्याचा प्रयत्न करू नये.

## निवडक

### अल्पवयीन मुलीचे अपहरण

**पनवेल :** अल्पवयीन मुलीचे अपहरण केल्याप्रकरणी एकावर पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. राहुल थडराई हे बारापाडा, पनवेल येथे राहत असून, त्यांची १४ वर्षीय बहीण शाळेत जाते, असे सांगून घरातून निघून गेली आणि परतलीच नाही. तिचा वर्ण सावळा, बांधा मध्यम, उंची पाच फूट आहे. मुलीबाबत अधिक माहिती असल्यास संपर्क साधण्याचे आवाहन पनवेल तालुका पोलिस ठाण्याचे सहायक निरीक्षक सुभाष डिगे यांनी केले आहे.

### ९३ कुटुंबांचे सुखरूप स्थलांतर

**पनवेल :** तीन दिवसांपासून सतत पडणाऱ्या पावसामध्ये पनवेल महापालिका क्षेत्रातील ९३ कुटुंबांच्या घरात पाणी शिरल्याने पालिका प्रशासनाने या कुटुंबांना सुखरूप शहरातील पालिकेच्या शाळांमध्ये, नवीन पनवेल येथील बुद्धविहारामध्ये आणि तालुका क्रीडासंकुलामध्ये निवाऱ्याची आणि जेवणाची सोय करून वेळीच आधार दिला. स्थलांतरित नागरिकांमध्ये बालकांचा व महिलांचा समावेश होता. महापालिका आयुक्त मंगेश चितळे यांनी स्थलांतरितांची भेट घेऊन विचारपूस केली.

### मारहाणीसह विषारी पदार्थ पाजला

**पनवेल :** चौघींनी मारहाण करून बावीस वर्षीय महिलेला विषारी पदार्थ पाजल्याप्रकरणी चौघींविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात १८ ऑगस्ट रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. यातील २२ वर्षीय महिला मूळची वेशवी वाडी, उरण येथील असून तीच्या पतीसोबत भांडण झाल्याने ती तक्का गाव जवळ राहते. १५ ऑगस्ट रोजी त्यांच्या वाडीतील चार महिला २२ वर्षीय महिलेला मारण्यासाठी आल्या आणि शिवीगाळ केली या वेळी मारहाण करून तिच्या तोंडात विषारी पदार्थ टाकला. त्यामुळे ती चक्कर येऊन खाली पडली. तिच्यावर उपजिल्हा रुग्णालय पनवेल येथे उपचार सुरू आहेत. पनवेल शहर पोलीस अधिक तपास करत आहेत.

# पनवेल परिसरात चोरीच्या घटनांमध्ये वाढ

## शिवकर गावात घरातून सोन्याचे दागिने चोरी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

शिवकर येथील घरात चोराने प्रवेश करून ३० ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने चोरी करून नेले. या प्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात १९ ऑगस्ट रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. चोर रेनकोट घालून आलेले दिसत आहेत. चोरीची ही घटना सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली आहे.

पनवेल तालुक्यात चोरांनी थैमान मांडला आहे. नेरे, नांदगाव पाठोपाठ शिवकर येथे देखील चोरांनी चोरी केली आहे. चोरीच्या घटना सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झालेले असल्या तरी देखील या चोरांचा कायमचा बंदोबस्त करण्यात पोलीस अपयशी ठरत आहेत. वाढत्या चोरीच्या घटनांमुळे नागरिक भयभीत झाले आहेत. लवकरच गणपती बाप्पांचे आगमन घरोघरी होणार आहे यापूर्वी या चोरांना अटक करण्याची मागणी केली जात आहे.




सावित्री पाटील या शिवकर येथे राहत असून त्यांच्या राहत्या घराच्या दरवाजाचा कडीकोयंडा तोडून चोरांनी आत प्रवेश केला आणि त्यांच्या लाकडी कपाटाच्या लॉकर मधून सोन्याचे कानातले टॉप, सोन्याची चैन, सोन्याच्या अंगठ्या आणि सोन्याचे मंगळसूत्र असा एकूण ३० ग्रॅम वजनाचा सोन्याचे दागिने चोरून नेले.

आई काळूबाई चायनीज कॉर्नरमधून रोख रककमेची चोरी केली. या वेळी काळूबाईच्या फोटोजवळ असलेले जवळपास दीड हजार रुपयांना चोरांनी हात देखील लावला नाही. या प्रकरणी पनवेल शहर पोलीस अधिक तपास करत असून या चोरांना लवकरात लवकर अटक करण्याची मागणी नागरिक करत आहेत.

## मोलकरणीने मारला डल्ला

**पनवेल :** खारघर सेक्टर १४ येथील रघुनाथ विहार या सोसायटीमधील एका सदनिकेत घरकाम करणाऱ्या महिलेने तब्बल पाच लाख रुपयांच्या दागिन्यांची चोरी केली आहे. या प्रकरणी खारघर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. सेक्टर १४ येथील रघुनाथ विहार या सोसायटीमध्ये राहणाऱ्या ६८ वर्षीय महिलेने दिलेल्या तक्रारीमध्ये त्यांच्या घरात काम करण्यासाठी नेमलेल्या महिलेने कपाटामध्ये ठेवलेल्या दागिन्यांवर डल्ला मारला आहे. खारघर पोलिसांनी या प्रकरणी घरकाम करणाऱ्या महिलेवर कारवाई केली. पोलिसांनी कामगारांचे चारीत्र्य पडताळणी प्रमाणपत्र तपासण्याचे आवाहन केले आहे.

## सद्भावना दिवसानिमित्त पनवेल महापालिका मुख्यालयात प्रतिज्ञा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दिवंगत पंतप्रधान राजीव गांधी यांच्या ८१व्या जयंतीनिमित्त बुधवारी महापालिका मुख्यालयात सद्भावना दिवस प्रतिज्ञा देण्यात आली.

जात, वंश, धर्म, प्रदेश किंवा भाषा विषयक भेद न करता भावनिक ऐक्य आणि सामंजस्य यासाठी काम करण्याची, तसेच सर्व प्रकारचे मतभेद हिंसाचाराचा अवलंब न करता संविधानिक मार्गांनी सोडविण्याची प्रतिज्ञा, परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे,मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉ. राजु पाटोदकर यांनी उपस्थितांना दिली.



या वेळी महापालिका सचिव अक्षय कदम, महापालिका अधिकारी व कर्मचारी तसेच विविध पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते.



**कळंबोली : महानगरपालिकेचे आयुक्त मंगेश चितळे, उपायुक्त वैभव विधाते व सहाय्यक आयुक्त श्रीराम पवार, आरोग्य विभाग प्रमुख अनिल कोकरे यांच्या सूचनेप्रमाणे श्री गणपती विसर्जन पूर्व तयारी सेक्टर १२ श्री म्हसोबा तलाव येथे तळ्याच्या आतील कचरा व बाहेरील परिसर गवत कचरा काढण्याची स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. या वेळी पाहणीदरम्यान, प्र.स.ब.चे प्रभाग अधिकारी मनोज चव्हाण, मुख्य आरोग्य निरीक्षक अरुण कांबळे, स्वच्छता निरीक्षक हरेश कांबळे, पर्यवेक्षक व कर्मचारी उपस्थित होते.**

## नागरिकांना बेंचेसची सुविधा



**उरण : बातमीदार**

उलवेमधील नागरिकांना प्रवास करताना विविध समस्यांना सामोरे जावे लागत होते. या परिसरात नागरिक मोठ्या प्रमाणात चालत जाऊन प्रवास करीत असतात. चालण्यामुळे जास्त थकवा येतो. त्यामुळे नागरिक बसण्यासाठी आसरा शोधत असतात, मात्र नागरिकांना कुठेही बसायला आसरा नसल्याचे लक्षात येताच जेष्ठ नागरिक आणि रहिवाशी यांच्या मागणी नुसार सामाजिक कार्यकर्ते प्रतिश वामन पाटील यांनी सेक्टर २४ उलवे नोड, हनुमान मंदिर जवळ येथे बसण्यासाठी बँचेसची व्यवस्था केली आहे. प्रवाशी वर्ग, नागरिक यांचा प्रवास सुखकर व्हावा हे या बँचेस बसविण्या पाठीमागील हेतू होता.





**पनवेल : भाजपचे युवा कार्यकर्ते रहीम लदाप यांना वाढदिवसानिमित्त भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष प्रल्हाद केणी, पनवेल तालुका पूर्व मंडळ अध्यक्ष भूपेंद्र पाटील, पनवेल उत्तर मंडळ अध्यक्ष दिनेश खानावकर, सुनील पाटील, युवा मोर्चा तालुका सरचिटणीस विश्वजित पाटील, यतीन पाटील, मयूर कदम, पवन भोईर, हेमंत माने, राजेंद्र पाटील, निशा वाडकर, मानवी पाटील, प्रतिभा पाटील, दीपक दुर्गे, नवनाथ पाटील, दर्शन ठोंबरे आदी उपस्थित होते.**

## नेरे येथील गिरीजा फाउंडेशनतर्फे अनाथाश्रमामध्ये धान्य, खाऊचे वाटप



**उरण : बातमीदार**

शिव प्रतिष्ठानच्या वतीने पनवेल तालुक्यातील नेरे येथील गिरीजा फॉउंडेशन अनाथाश्रम मध्ये धान्य व खाऊचे वाटप करण्यात आले. या वेळी संस्थेचे अध्यक्ष सत्यजित पाटील, सुषमा मयेकर, प्रियांका ठाकूर, संदीप पाटील, राकेश कुसळे, अविनाश ठोसर, सुरेश बार्वे, अमर सावंत, राजेश शेलार, दीपक, ओंकार, शशांक, आदी मान्यवर उपस्थित होते.

या सामाजिक उपक्रमावेळी संस्थेचे अध्यक्ष सत्यजित पाटील यांनी रायगडमधील सर्व अनाथ आश्रमामध्ये प्रत्येक सामाजिक संस्थानी अन्न धान्य किंवा काही आर्थिक मदत देण्याचे उपक्रम राबविले पाहिजे तरच अनाथ मुलांना पुढील आयुष्यासाठी मदत होईल. यासाठी सर्वांनी पुढाकार घेऊन अनाथाश्रममधील मुलांना सहकार्य करावे, असे आवाहन केले.

शिवप्रतिष्ठान करंजाडे या संस्थेच्या माध्यमातून आजपर्यंत अनेक समाजउपयोगी उपक्रम राबविण्यात आले आहेत.

सामाजिक बांधिलकी जपत शिवप्रतिष्ठान सामाजिक संस्थेने अनाथाश्रम मध्ये अन्न धान्य व खाऊ वाटप केल्याने आश्रमातील मुलांच्या चेहऱ्यावर हसू उमटले. विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण होते.

या वेळी विद्यार्थ्यांनीही या उपक्रमास प्रतिसाद देत आपल्या भावना व्यक्त केल्या.

## पालेभाज्यांचे दर दुप्पट
### पावसामुळे आवक घटली

**पनवेल : प्रतिनिधी**

राज्यात सुरू असलेल्या पावसामुळे पालेभाज्यांची आवक कमी झाली आहे. आवक निम्म्याने कमी झाली असल्याने दर दुप्पट झाले आहेत. गेल्या तीन दिवसांपासून सुरू असलेल्या पावसामुळे पालेभाज्यांची काढणी झाली नाही, तसेच पावसामुळे पालेभाज्या भिजल्याने नुकसान झाले आहे. मागणीच्या तुलनेत पालेभाज्यांची आवक कमी झाल्याने दर दुप्पट झाले आहेत, अशी माहिती पालेभाजी व्यापाऱ्यांनी दिली.



पावसामुळे लिंबांची तोड झाली नाही. त्यामुळे बाजारात लिंबांची आवक मागणीच्या तुलनेत कमी प्रमाणावर होत आहे. लिंबांच्या १८ ते २० किलो गोणीच्या दरात १०० रुपयांनी वाढ झाली.

## रांजणपाडा येथे गौरी गणपतीनिमित्त बाल्या नृत्याची तयारी

**उरण : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्याला लोककलेची परंपरा लाभली असून, ही लोककला जपण्याचा प्रयत्न प्रामुख्याने उरण तालुक्यात केला जात आहे. सांस्कृतिक वारसा लाभलेल्या उरण तालुक्यातील रांजणपाडा या गावात १८ ऑगस्ट रोजी जय हनुमान नाच मंडळाच्या वतीने बाल्या नृत्याच्या सरावाचे उद्घाटन करण्यात आले.

भाद्रपद महिन्यात गौरी गणपतीच्या उत्सवासाठी तसेच नवरात्रीसाठी या मंडळाकडून तालुक्यात अनेक ठिकाणी बाल्या नृत्याचे कार्यक्रम होत असतात. मागील पंचवीस वर्षाची परंपरा या नाच मंडळाला असून या नाच मंडळाच्या स्थापनेच्या सुरुवातीचे गायक हे गव्हाणकोपरचे स्वर्गीय अमृत बुवा मोकल होते. त्यांनीच या नाच मंडळाला योग्य मार्गदर्शन केले आहे. त्यानंतर उरण महालण विभागातील डोंगरी गावचे कवी गायक भालचंद्र घरत यांचाही या नाच मंडळाला मोठा आधार लाभला होता. त्यांनीही या नाच मंडळाला मोठे सहकार्य केले असल्याची माहिती उद्घाटन प्रसंगी देण्यात आली. उद्घाटनावेळी ज्येष्ठ नागरिक रमेश पाटील, नाटककार हसूराम पाटील, रमाकांत म्हात्रे, अनंत पाटील, रमेश म्हात्रे, राजेश ठाकूर, सुदर्शन पाटील, अलंकार कडू, प्रवीण नाईक, पांडुरंग पाटील, गुरुनाथ म्हात्रे, चंद्रकांत पाटील, विलास पाटील, अंकुश ठाकूर तसेच गावातील अन्य नागरिक उपस्थित होते.



## ज्येष्ठ नागरिक दिन-कृतज्ञता संवाद कार्यक्रम तूर्तास रद्द

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेमार्फत येत्या २१ ऑगस्टला गुरुवारी ज्येष्ठ नागरिक दिन-कृतज्ञता संवादचे आयोजन आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात करण्यात आले होते.परंतु अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर २१ ऑगस्ट रोजी होणारे कार्यक्रम रद्द करण्यात आले आहेत.

लवकरच या कार्यक्रमाची पुढील तारीख जाहीर करण्यात येणार असल्याचे महापालिकेच्या वतीने सांगण्यात आले आहे. अशी माहिती पनवेल महापालिकेच्या प्रसिद्धी विभागामार्फत देण्यात आली आहे.



## आवरे भोलानाथ मंदिरात श्रावणातील शेवटच्या सोमवारची आरती उत्साहात

**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील आवरे येथील अनेक भक्तांचे श्रद्धास्थान असलेल्या भोलानाथ मंदिरात सोमवार आरती मंडळाच्या वतीने यंदाच्या श्रावण महिन्यातील चौथ्या साप्ताहातील सोमवारची भोलेनाथांची आरती विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थित मोठ्या भक्तिमय वातावरणात आणि उत्साहात झाली.

सुरुवातीलाच प्रार्थमिक शिक्षक तथा संगीत विशारद गणेशप्रसाद गावंड यांच्यासह, नरेश गावंड, सुधाकर म्हात्रे, प्राथमिक शिक्षक महेश गावंड, माध्यमिक शिक्षक विद्याधर गावंड,हितेंद्र म्हात्रे, अभिषेक गावंड व दिव्यांशू केणी यांच्या सुरेलू आणि गोड वाणीसह ढोलकीवादन व टाळ, मृदूंगाच्या भक्तिमय गायनाने मंदिरातील आरतीसाठी उपस्थित भक्तांना मंत्रमुग्ध केले.

आवरे गावातील गावाच्या प्रारंभी अथांग पाण्याने भरलेल्या भव्य तलावाच्या काठी बांधण्यात आलेल्या या प्राचीन शिवममंदिरात शिवशंकर, शंभूमहादेव, भोलानाथांच्या दर सोमवारच्या आरतीची प्रथा मागील कित्येक वर्षांपासून कायम सुरुच आहे.



यंदाच्या या भोलानाथ मंदिरातील श्रावण महिन्यातील चौथ्या सोमवारच्या आरतीचा मान नवी मुंबई पोलीस दलातील श्वान पथकातील पोलीस हवालदार शिवकुमार गावंड, भारती गावंड या दापंत्यास मिळाला होता. हवालदार गावंड यांचे चिरंजीव ऋषिकेश गावंड याच्या वाढदिवसाचा योग या श्रावणातील सोमवारच्या आरती निमित्ताने आल्याने त्यांना शिवभक्तांना तिर्थ व महाप्रसाद अर्पण करण्याची संधी प्राप्त झाली होती.

चौथ्या सोमवारच्या श्रावणातील आरतीसाठी आवरे ग्रामपंचायतीच्या माजी सरपंच निरूबाई पाटील, स्वर्गीय माजी मुख्याध्यापक ज.पा.गावंड यांच्या अर्धांगिनी कुमुदिनी गावंड, खोपटे इंग्रजी माध्यम शाळेच्या संचालिका रश्मी ठाकूर, धाकटीजुईच्या शशिकला घरत, प्रार्थमिक शिक्षिका छाया गावंड, जयश्री गावंड, रुमावती केणी, कामिनी गावंड, आशासेविका उर्मिला गावंड, गोवठणे येथील तेजस म्हात्रे, प्रदीप गावंड, अमित म्हात्रे आदी उपस्थित होते.

कोसळत्या पावसात कोणत्याही प्रकारची उणीव न राहता हा कार्यक्रम यशस्वी रित्या पार पाडण्यासाठी ज्ञानेश्वर गावंड,निवृत्त शिक्षक अनंत पाटील यांच्यासह गावातील नागरिकांनी मेहेनत घेतली.

## संपादकीय

# निवडणुकीची औपचारिकता

संसदेतील सध्याचे पक्षीय बलाबल पाहता भाजपप्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे उपराष्ट्रपतीपदाचे उमेदवार सी. पी. राधाकृष्णन यांची निवड ही केवळ औपचारिकता असल्याचे मानले जाते आहे.

**उपराष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीसाठी भाजपप्रणित एनडीए म्हणजेच राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे सी. पी. राधाकृष्णन आणि इंडिया आघाडीचे माजी न्या. बी. सुदर्शन रेड्डी हे दोन उमेदवार रिंगणात आहेत. माजी उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी प्रकृतीच्या कारणास्तव आपल्या पदाचा राजीनामा दिल्यानंतर हे पद रिक्त झाले आहे. महाराष्ट्राचे राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांच्याशी सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायमूर्ती बी. सुदर्शन रेड्डी यांची या निवडणुकीत लढत होणार आहे. महाराष्ट्राच्या राज्यपालपदी नियुक्ती होण्यापूर्वी सी.पी. राधाकृष्णन हे तामिळनाडूमधून दोनदा लोकसभेवर निवडले गेले होते. उपराष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीत विरोधकांच्या इंडिया आघाडीतर्फे बी. सुदर्शन रेड्डी यांची उमेदवारी मंगळवारी जाहीर करण्यात आली. न्या. रेड्डी हे सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती आणि गोव्याचे पहिले लोकायुक्तही आहेत. काँग्रेस अध्यक्ष व राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खर्गे यांनी उपराष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीचे वर्णन 'वैचारिक लढाई' असे केले असले तरी सत्ताधारी भाजपप्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडीचा उमेदवार उपराष्ट्रपतीपदी बिनविरोध निवडून येऊ नये हे एकमेव कारण काँग्रेसप्रणित इंडिया आघाडीने ही निवडणूक लढवण्यामागे आहे हे उघड आहे. त्यामुळेच निवडणुकीची औपचारिकता पूर्ण करण्यासाठी इंडि आघाडीने न्या. रेड्डी यांची उमेदवारी जाहीर केली आहे. उपराष्ट्रपतीपदासाठी दक्षिण भारतातूनच उमेदवार आणण्याची इंडि आघाडीतील द्रमुकची मागणी होती. तर तृणमूल काँग्रेसने उमेदवार गैरराजकीय पार्श्वभूमीचा असावा असा आग्रह धरला होता असे समजते. द्रमुकचे तिरुची सिवा या पदासाठी उत्सुक होते. परंतु न्या. रेड्डी यांच्या नावावर इंडि आघाडीत एकमत झाल्याने सिवा यांचे नाव मागे पडले. निवृत्तीनंतर रेड्डी यांनी मार्च २०१३ साली गोव्याचे पहिले लोकायुक्त म्हणून पदभार स्वीकारला. लोकायुक्त म्हणून त्यांची कारकीर्द काहिशी वादग्रस्त ठरली होती. त्यानंतर लगेचच ऑक्टोबर २०१३ मध्ये त्यांनी वैयक्तिक कारणांमुळे या पदाचा राजीनामा दिला. राष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीपेक्षा उपराष्ट्रपतीपदाची निवडणूक वेगळी असते. उपराष्ट्रपतीपदासाठी फक्त लोकसभा व राज्यसभेचे खासदार मतदान करतात. विधानसभा वा विधान परिषदेचे आमदार या निवडणुकीत मतदान करीत नाहीत. प्रत्येक मतदाराचे मत हे गोपनीय पद्धतीने नोंदवले जाते. ९ सप्टेंबर रोजी होणाऱ्या उपराष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीत लोकसभेचे ५४३ आणि राज्यसभेचे २३९ असे एकूण ७८२ खासदार मतदान करतील. उपराष्ट्रपतीपदाची ही निवडणूक जिंकण्यासाठी आवश्यक असणारे स्पष्ट बहुमत भाजपप्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडीकडे आहे. विरोधकांनी तेलगु भाषक चेहरा दिल्याने तेलगु देशम, बीआरएस, वायएसआरसीपी या पक्षांची कोंडी झाल्याचे बोलले जात होते. परंतु सी. पी. राधाकृष्णन यांना 'वायएसआरसीपी' पक्षानेही पाठिंबा जाहीर केला आहे. 'वायएसआरसीपी'चे प्रमुख जगनमोहन रेड्डी यांच्याशी विरोधी पक्षांनी संपर्क साधला होता. मात्र जगनमोहन रेड्डी यांनी रालोआ उमेदवार राधाकृष्णन यांच्याच उमेदवारीचे समर्थन केल्याचे समजते. सर्व खासदारांनी एकदिलाने राधाकृष्णन यांना पाठिंबा द्यावा असे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले आहे. दरम्यान 'आप'ने न्या. रेड्डी यांच्या नावाला पाठिंबा दर्शवला आहे. काहीही असले तरी या निवडणुकीत अजिबात चुरस नसून ही निवडणूक एकतर्फी ठरण्याची चिन्हे आहेत व राधाकृष्णन यांचा विजय निश्चित दिसतो आहे.**

# पोलादपूरमध्ये सामाजिक संस्थेमार्फत सामाजिक परिवर्तनाची नांदी



**खबरबात**
**शैलेश पालकर**

पोलादपूर तालुक्यात ५ वर्षांपूर्वी काहीच घडत नव्हतं, अशी भाषा एका सामाजिक संस्थेमार्फत २०१४ पूर्वी देशात काहीच घडलं नाही, अशा धर्तीवर सुरू झाली आहे. तहसिल कार्यालयामध्ये उशिराने येणाऱ्या सरकारी कर्मचाऱ्यांच्या अंगावर जाणे, पोलादपूर एस.टी.स्थानकातील वाहतूक नियंत्रकांना व कर्मचाऱ्यांना मुतारीमध्ये कोंडून ठेवणे अथवा अर्वाच्च भाषेमध्ये आरडाओरड करणे, महावितरणच्या अभियंत्यांना रेडयांच्या झोंबीचे आवाहन करीत घोळक्याने विविध प्रश्नांची सरबराई करून अडचणीत आणणे आणि संघटनेच्या कार्यक्रमामध्ये व्यासपिठावर सन्मानाने बसविणे, पत्त्यांचा जुगार तसेच अन्य अवैध धंद्यांवर जिल्हा पोलीस अधिक्षक कार्यालयाने बंदी घातली असल्याने हे अवैध धंदे चालविणारे बेरोजगार होऊन या सामाजिक संघटनेमध्ये महत्वपूर्ण भूमिकेतील कार्यकर्ते म्हणून वावरत असल्याचे दिसून येत आहेत. दरडग्रस्त आणि सामाजिक प्रश्नांनी त्रस्त जनतेसाठी कार्यरत असल्याने सोशलमिडीया आणि सोशल नेटवकाअगच्या माध्यमातून प्रसिध्दीझोतात राहिलेली ही संघटना 'आपली माती आपली माणसं' नावाने तालुकाभर ओळखली जाऊ लागली आहे.

'आमची माती आमची माणसं' संघटनेच्या मुंबईस्थित समाजसेवी तरूण सदस्यांकडून विद्यार्थी–विद्यार्थिनींना मोफत वह्या वाटप करण्यात आल्यानंतर स्थानकातील नवीन स्वच्छतागृहाच्या निरूपयोगी बांधकामाबद्दल तीव्र संताप व्यक्त करीत एस.टी.महामंडळाच्या अभियंत्यांच्या उपस्थितीत एस.टी.स्थानकात 'खळळखटयाक' आंदोलनही करण्यात आले. त्यामुळे सामाजिक बांधीलकी आणि असामाजिक कृतीची जोड राजकीय आणि सामाजिक व्यक्तींच्या मोट बांधून झालेल्या उपक्रमांत विशेष दिसून आली.

पोलादपूर महावितरण कार्यालयामध्ये झालेल्या चर्चेदरम्यान आपली माती आपली माणसं सामाजिक संघटनेने पोलादपूर महावितरणला दिलेली एक महिन्याची मुदत देऊन 'रेडयांच्या झोंबी'च्या आयोजनाचा इशारा दिला होता. त्यानुसार तालुक्यातील एकूण दरवाजा नसलेल्या ७५ ट्रान्फमर कॅबिनचे दरवाजे लावण्यास सुरूवात झाली. एकूण २०५ खराब होऊन सडलेले पोल तसेच एकूण १०८२ खराब झालेली विद्युतमीटर बदण्यास सुरूवात करण्यात आली. हजारो ग्राहकांचे वाढीव वीजबिल ताबडतोब कमी करण्याकामी सहकार्य केले. महावितरण कंत्राटदाराकडून नवीन पोल व नवीन लाईट कनेक्शन देण्यासाठी अवाजवी रक्कम घेण्यास प्रतिबंध बसला. ग्राहकांची लूट करणाऱ्या महावितरण कर्मचाऱ्यांवर कारवाई सुरू झाली. पोलादपूर तालुक्यातील व रायगड जिल्ह्यातील महावितरणच्या एकूण ७ टीम पोलादपूर मध्ये दाखल होऊन युध्दपातळीवर काम सुरु असल्याची माहिती महावितरणचे अभियंते चोरमाळे, पाटील, महाडीक, चव्हाण आणि कदम यांनी दिली.

पितळवाडी व पोलादपूर कार्यालयात येऊन वाढीव लाईट बिल कमी करून घेण्यासाठी महावितरणकडून नागरिकांना आवाहन करण्यात आले असून खराब पोल, व खराब मीटर असल्यास प्रत्येक गावकऱ्यांनी व संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी महावितरणला फोटो व माहिती महावितरणला कळवण्याची विनंतीदेखील करण्यात आली. यामुळे महावितरणच्या अभियंते व अधिकाऱ्यांनी आवारात रेडयांच्या झोंबीचे आयोजन होण्यापेक्षा जनतेची कामे करून देण्यास प्राधान्य दिल्याने संघटनेचे 'आमची माती आमची माणसं' संस्थापक राज पार्टे आणि अध्यक्ष निलेश कोळसकर यांनी महावितरणच्या अभियंता अधिकाऱ्यांना धन्यवाद दिले. या जनसेवेमुळे ही संघटना विशेष चर्चेत आली. पितळवाडीतील प्राथमिक आरोग्य केंद्र असो वा अन्य शासकीय संस्थांमध्ये या सामाजिक संस्थेचा वावर वाढला. जनतेशी संबंधित प्रश्नांवरील आंदोलनाच्या इशाऱ्यामुळे पोलीस आणि महसूल तसेच पंचायत समिती प्रशासनासोबत सामाजिक संस्थेच्या कार्यकर्त्यांची जवळीकही वाढली. मात्र, अनेक सरकारी अधिकारी कर्मचारीवर्गाला दहशत निर्माण होईल, असे वर्तन या संघटनेच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांकडून होऊ लागले. यानंतर या संघटनेने पोलादपूर तालुक्यातील कापडे बुद्रुक येथील रामवरदायिनी माध्यमिक विद्यालयामध्ये हेल्मेट वाटप करण्याच्या निमित्ताने ज्या लोकांना व्यासपिठावर निमंत्रित केले होते. त्यापैकी अनेक मान्यवरांना सामाजिक संस्थेकडून त्रासही झाला असल्याचे उपस्थितांना जाणवले.

आपली माती आपली माणसं संघटनेकडून रविवार, दि. १० ऑगस्ट २०२५ रोजी साखर सुतारवाडीतील दरडग्रस्तांच्या पुनर्वसनासंदर्भात दरडग्रस्तांची भेट घेऊन सोमवारी तहसिल कार्यालय आणि पोलीस प्रशासनाला निवेदन देत स्वातंत्र्यदिनी आत्मदहन आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला. यावेळी प्रशासनाकडून साखर सुतारवाडीतील दरडग्रस्तांना आत्मदहनापासून परावृत्त करण्यासंदर्भात बैठकांचे सत्र सुरू झाले. या संघटनेच्या एका सक्रीय कार्यकर्त्याला स्वातंत्र्यदिनी पालकमंत्र्यांच्याहस्ते गौरविण्यात येणार असल्याने हे आत्मदहन आंदोलन १४ ऑगस्टला त्याच्याच उपस्थितीत पार पाडण्याचे ठरले. यातून साखर सुतारवाडीमध्ये सरण रचण्यात येऊन ते पेटवून त्यावर आत्मदहनाच्या हुलकावण्या देण्याचा प्रकार घडवित प्रशासनावर दबाव निर्माण करण्यात आला. प्रधानमंत्री आदिवासी जनमन घरकुल या बंद झालेल्या योजनेमध्ये २.१० लाख दिले जात होते आणि घरकुलासाठी १.३०लाख दिले जात असताना मुख्यमंत्री ना.फडणवीस यांनी ५० हजार वाढविण्याचे धोरण जाहिर केले. साखर सुतारवाडीमध्ये २.३० लाख रूपये दरडग्रस्तांच्या घरकुलांसाठी देण्यात आले आहेत. मात्र, ही रक्कम अत्यल्प असल्याची चर्चा घडवून त्यांना आत्मदहनासाठी प्रवृत्त करीत मंत्री ना.गोगावले यांना नारळ फोडण्यापूर्वी श्रावणात श्रीदत्तगुरूरायांना गाऱ्हाणं घालायला लावून प्रत्येकी १० लाख रूपयांची वाढ करण्याकामी आश्वासन देण्यास भाग पाडले गेले. यातून तोडी दिलासा देण्याचे काम या संस्थेमार्फत करण्यात आले असले तरी कागदोपत्री महत्व काही नाही.

मुंबईस्थित सामाजिक कार्यकर्ते पदाधिकारी यांच्या डॅशिंग नेतृत्वाच्या मुंबईमधील तसेच पोलादपूर तालुक्यातील रिल्स आणि फेसबुक व्हिडीओ व्हायरल होत असताना स्थानिक कार्यकर्त्यांनाही दहशतीची भाषा कायम ठेऊन सोशल आणि ॲण्टीसोशल एलिमेंटससोबत घेऊन दबदबा निर्माण करायची इच्छा दिसून आली. यासाठी युटयूबर आणि वेबपोर्टल पत्रकारितेचा आधार घेत देत प्रयत्न सुरू झाले. या आंदोलनानंतर संस्थापकाने राग असलेल्या राजकीय व्यक्तीचा नामोल्लेख एका वृत्तपत्रातून पाहून राग काढताना पत्रकारांना दलाल म्हणण्याचे दु:साहस केल्याने या संस्थेची धर्मादाय नोंदणी पाहण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. नगरपंचायत असलेल्या पोलादपूरकरांसाठी गटविकास अधिकाऱ्यांशी चर्चा करून शौचालय बांधणे आणि कापडे बुद्रुक येथील कार्यक्रमानंतर सामाजिक संस्था म्हणून रूग्णवाहिका देण्याचे आश्वासन जाहिर करताना यामागे तालुक्यातील हॉटेल, अधिकारी, दुकानदार, लॉजिंग तसेच अवैध धंदे यांना वेठीस धरण्याचा प्रकार झाल्यास असामाजिक तत्व आणि व्यक्तींना तालुक्याने थारा देता कामा नये, अशी अपेक्षा पोलादपूरवासियांकडून पोलादपूरकरांकडे व्यक्त होत आहे.



## बदलते तंत्रज्ञान

# फोन नीट धरा; अन्यथा करंगळी होईल वाकडी!

तुम्ही मोबाइल करंगळीने म्हणजेच हाताच्या सर्वांत लहान बोटावर धरत असाल तर काळजी घ्या. तुम्ही पिंकी, कार्पल टनल आणि क्युबाइटल टनल सिंड्रोमचे बळी ठरू शकता. यामुळे, बोटांची आणि हातांची रचना विकृत होऊ शकते. याने मेंदूशी संबंधित नसांवरही परिणाम होऊ शकतो. जबलपूरच्या नेताजी सुभाषचंद्र बोस मेडिकल कॉलेज हॉस्पिटलमध्ये अशी प्रकरणे नोंदवली गेली आहेत. मोबाईलची सवय अनेकांना लागली असून, याचा नकारात्मक परिणाम प्रत्येकाच्या शरीरावर होताना दिसत असल्याचे आतापर्यंतच्या अनेक अहवालांतून समोर आले आहे. जवळपास आता सर्वांच्याच हातात स्मार्टफोन आले आहेत, मात्र हा स्मार्टफोन आपण कसा हातात पकडतो यावर आपल्या हाताचे आरोग्य अवलंबून असल्याचे आता निदर्शनास आले आहे. याबद्दल फिजिओथेरपिस्ट डॉ. अजय फौजदार यांनी माहिती दिली आहे.



**केस १ : हात सुन्न पडतो**

कंपनीत काम करणारा तरुण (२५) सर्व कामे फोनद्वारे करतो. करंगळीवर फोन धरण्याची त्याला सवय झाली. त्यामुळे हात सुन्न पडायला सुरुवात झाली. मानेपासून पाठीपर्यंत वेदना सुरू झाल्या.

**केस २ : करंगळीवर पडला खड्डा**

१८ वर्षीय तरुणी करंगळीवर फोन ठेवून फोन वापरतो. यामुळे बोटांचे स्नायू कमकुवत झाले. करंगळीत वेदना होत होत्या. सतत करंगळीवर फोन पकडल्याने करंगळीवर खड्डा पडला.


**काय होते?**

प्रथम करंगळी वाकडी होण्यास सुरुवात होते. दुसरा टप्पा कार्पल टनल सिंड्रोम असतो. यात तळहात आणि मनगटावर वेदना निर्माण होतात. तिसरा टप्पा क्यूबाइटल सिंड्रोम धोकादायक आहे. यामध्ये बोटांवर ताण आल्याने हाताच्या संरचनेवर परिणाम होऊन स्नायू व मज्जातंतूंवर परिणाम होतो.

**मोबाइलचे वजन किती?**

सामान्य वजन ११३ ते १९८ ग्रॅम, सरासरी वजन १९९ ते ३०० ग्रॅम, अधिक वजन ३०१ ग्रॅमपेक्षा, कव्हरचे वजन ५० ते २५० ग्रॅम. मोबाइल करंगळीने जास्त वेळ धरून ठेवल्याने पिंकी, कार्पल टनल व क्यूबाइटल टनल सिंड्रोम होतो. वेदना कोपरपासून मानेपर्यंत पसरते. न्यूरोलॉजिकल आजाराचा धोकादेखील असतो.

# चित्रपट हास्य अभिनेते शरद तळवलकर



**निमित्त**

शरद तळवलकर हे मराठी चित्रपटांतील अभिनेते होते. आज त्यांचा स्मृतीदिन आहे. पु.ल. देशपांडे यांनी शरद तळवलकरांच्या अभिनयाचे मार्मिक वर्णन करून ठेवले आहे. ते म्हणतात, अभिनयातील सहजता हा दुर्मीळ गुण शरदमध्ये आहे. आपलं बोलणं विनोदी करायला त्याला कसलीही युक्ती वापरावी लागत नाही. नाटककाराने लिहिलेला संवाद पुरेसा हशा पिकवणारा नाही, या समजुतीने काही विनोदी नट आपली विनोदबुद्धी वापरतात, नको त्या ठिकाणी नको इतके अंगविक्षेप करतात. हशा पिकवण्यासाठी शरदला यापैकी कशाचीच गरज भासली नाही.

शरद गणेश तळवलकर यांचा जन्म नगर जिल्ह्यातील बोधेगाव येथे झाला. त्यांचे शालेय शिक्षण पुण्याच्या भावे हायस्कूलमधून झाले. शाळेत असताना ते शिक्षकांच्या नकला हुबेहूब करायचे. १९३५ साली 'रणदुंदुभी' नाटकात शिशुपालाची भूमिका करणारा कलाकार ऐन वेळी अडला आणि शरद तळवलकरांनी आपल्या अभिजात कलागुणांनी त्या भूमिकेत कमालीचा रंग भरला. तेव्हापासून दर वर्षी स्नेहसंमेलनाच्या नाटकात त्यांच्यासाठी आग्रह धरला जाऊ लागला. नटश्रेष्ठ केशवराव दाते यांच्या पाहण्यात त्यातील एक भूमिका आली आणि त्यांच्या 'नाट्य विकास' संस्थेत त्यांनी तळवलकरांना निमंत्रण दिले. नाटकात कामे करणे ही त्या काळात फारशी समाजमान्य गोष्ट नव्हती. वडिलांनी नाटक कंपनीत जाण्यास विरोध केल्यानंतर नाटकाच्या वेडापायी शरद तळवलकरांनी घर सोडले.


अभिनयाबाबत मार्गदर्शन घेण्यासाठी तळवलकर कोल्हापूरला मा. विनायक यांच्या 'हंस पिक्चर्स'मध्ये बाबूराव पेंढारकरांना भेटले. त्यांच्या सल्ल्यानुसार त्यांनी आधी शिक्षण पूर्ण करायचे ठरवून जोडीला अकाऊंटंटची नोकरी पत्करली. महाविद्यालयाच्या नाटकांतूनही त्यांच्या भूमिका प्रेक्षकप्रिय झाल्या. व्यावसायिक नाटकांतून भादव्या, फाल्गुनराव, कामण्णा, तळीराम, धैर्यधर अशा भूमिका शरद तळवलकर करू लागले. १९५२ साली गाजलेल्या 'पेडगावचे शहाणे' आणि 'लाखाची गोष्ट' या राजा परांजपे दिग्दर्शित चित्रपटांत त्यांना छोट्या भूमिका मिळाल्या. तसेच, दत्ता धर्माधिकारी यांच्या 'अखेर जमलं' या चित्रपटात लक्षात राहण्याजोगी भूमिका मिळाली.

१९५५ साली आलेल्या 'करायला गेलो एक' या तुफान विनोदी फार्सने शरद तळवलकरांचे नाव महाराष्ट्रभर केले. तेथून त्यांची यशस्वी वाटचाल सुरू झाली. अभिनयाच्या वेडापायी त्यांनी पुणे विद्यापीठातील नोकरीही सोडली. पुढे राजा गोसावी यांच्याबरोबर 'अवघाची संसार', 'दोन घडीचा डाव' आणि 'याला जीवन ऐसे नाव' हे त्यांचे चित्रपट गाजले. 'रंगल्या रात्री अशा' (१९६२) या चित्रपटात शरद तळवलकरांना आव्हानात्मक भूमिका मिळाली. 'बायको माहेरी जाते' या चित्रपटातील त्यांची विनोदी भूमिकाही गाजली. अत्यंत सहज आणि उत्स्फूर्त अभिनय हे त्यांचे वैशिष्ट्य होते.

शरद तळवलकरांनी १९५१ साली कारवारला व्यावसायिक रंगभूमीवर 'संशयकल्लोळ'मधील सुभानराव सर्वप्रथम केला. 'अपराध मीच केला'मधील गोके मास्तर, 'दिवा जळू दे सारी रात'मधील पोस्ट मास्तर, या व्यक्तिरेखांबरोबरच 'एकच प्याला', 'भावबंधन', 'घरोघरी हीच बोंब', 'आप्पाजींची सेक्रेटरी' या नाटकांतील त्यांच्या भूमिकाही गाजल्या. असा हा चतुरस्र कलावंत अखेरपर्यंत रंगभूमीवर कार्यरत राहिला. 'डार्लिंग डार्लिंग', 'सखी शेजारिणी' आदी नाटकांचे प्रयोग सुरू असतानाच अखेरचा श्वास घेतला. विनोदाच्या आणि सहजसुंदर अभिनयाच्या प्रवासाला पूर्णविराम मिळाला.

**– अभिजित पेंढारकर**

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# 'ही' आयुर्वेदिक वनस्पती चघळा, मधुमेहावर रामबाण

भारत हा मधूमेहाची राजधानी होणार आहे. एका सर्व्हेक्षणात भारतातील ४० वर्षांवरील व्यक्ती ही लठ्ठपणाची शिकार झाली आहे. त्यामुळे ब्लड प्रेशर आणि डायबिटीसमुळे अनेक जण आजारी आहेत. प्रत्येक व्यक्तीची प्रकृती एकसारखी नसते. डायबिटीजमुळे पिडीत व्यक्तीचा आहार देखील एक सारखा नसतो. डायबिटीज कंट्रोल करण्यासाठी शरीराला एक्टीव्ह ठेवणे गरजेचे असते, परंतू आयुर्वेदिक वनस्पतीमुळे शरीरातील शुगर कंट्रोल ठेवणे सोपे जाते. ज्येष्ठमधाची कांडी यासाठी रामबाण ठरू शकते. यात एंटीऑक्सीडेंट्स आणि पोषक तत्वे भरपूर असतात. चला तर पाहूयात ब्लड शुगर कंट्रोल ठेवण्यासाठी ज्येष्ठमधाच्या काड्या कशा फायदेशीर ठरतात.



**डायबिटीज रोखण्यासाठी ज्येष्ठमध (मुलेठी) फायदेशीर का आहे?**

शरीरात ब्लड शुगर कंट्रोल करण्यासाठी ज्येष्ठमध खूप महत्वाचे आहे. वास्तविक ज्येष्ठमधात एंटीऑक्सीडेंट्स भरपूर असते. डायबिटीज दरम्यान होणाऱ्या समस्या कमी करण्यासाठी ज्येष्ठमध वनस्पती खूप फायद्याची आहे. काही संशोधनानूसार ज्येष्ठमधाच्या काड्यांचे सेवन केल्याने सारखी सारखी साखर खाण्याची इच्छा कंट्रोल होते.

**कसे सेवन करावे?**

ज्येष्ठमधाच्या (मुलेठी) ब्लड शुगर लेव्हल काही प्रमाणात कमी होऊ शकते. तुम्ही रात्री झोपण्यापूर्वी तोंडात ज्येष्ठमधाच्या काड्या ठेवाव्यात. ज्येष्ठमधाच्या काड्यामुळे तुम्हाला साखर खाण्याची इच्छा होत नाही.

**ज्येष्ठमधाचा चहा**

ज्येष्ठमधाच्या चहा तयार करण्यासाठी १ कप पाणी घ्यावे, त्यात २ ते ३ ज्येष्ठमधाच्या काड्या टाकून चहा बनवावा. नंतर गाळून हा चहा घ्यावा त्याने ब्लड शुगरची लेव्हल कमी होईल

**ज्येष्ठमध (मुलेठी)**

एक बारमाही मिळणारे वनऔषधी आहे. याचे मूळ दक्षिण युरोप आणि पश्चिम आशियामध्ये आहे.वनस्पतीचे इंग्रजी नाव Glycyrrhiza glabra आहे. त्याचा ग्रीक भाषेतील अर्थ Glykys (गोड) आणि Rrhiza (रूट) या दोन शब्दांपासून बनलेला आहे.

**(ही माहिती सर्वसामान्य ज्ञानावर आधारीत आहे. अधिक माहीतीसाठी तुमच्या फॅमिडी डॉक्टरशी संपर्क करावा)**

# रायगड जिल्ह्यात अतिवृष्टीत कर्जत तालुक्यात घरांची पडझड

## चार घरे कोसळली, गरीब कुटुंब उघड्यावर

**नेरळ, कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यात विविध भागांत घरे कोसळून गरीब कुटुंबे उघड्यावर आल्याचे चित्र समोर आले आहे.

कर्जत तालुक्यातील आषाणे आदिवासी वाडीतील खडके कुटुंबाचे घर कोसळल्याची घटना ताजी असताना कळंब-वारे येथील नवसुची वाडीमध्ये नरेश हासू केवारी यांचे संपूर्ण घर जमीनदोस्त झाले.आहे. सुदैवाने पती-पत्नी आणि दोन लहान मुले शेजारील घरी झोपायला गेल्याने जीवितहानी टळली. मात्र घरातील भांडी,कपडे,भरून ठेवलेले कडधान्य,तांदूळ,घरगुती सामान हे यामध्ये भिजून जाऊन नष्ट झाले आहे.त्यामुळे केवारी कुटुंबावर उपासमारीची वेळ असून बेघर



राहण्याची वेळ आलेली आहे.

तालुक्यातील सावळे गावातील मंगेश सोनवळे यांच्या घराची भिंत कोसळली,गौरकामत ,बारणे या गावात राहणारे भाऊ मोडक यांच्या ही घराची भिंत कोसळली असल्याचे समोर आलेले आहे.सुदैवाने व दुर्घटनेत कुठलीही जीवितहानी झालेली नसली तरी या दुर्घटनांमुळे चार कुटुंबे अक्षरशः बेघर झाली आहेत. घरावरचे छप्पर गमावलेल्या कुटुंबांना आता पावसाळ्यात आसरा कुठे हा प्रश्न उभा राहिला आहे.

### प्रशासनाची निष्क्रियता पुन्हा उघड!

***प्रशासनाकडून वेळेवर पाहणी व मदत न मिळाल्यास या कुटुंबांपुढे जगण्याचा प्रश्न उभा राहणार आहे. आजच्या घटनेने पुन्हा एकदा हे स्पष्ट झाले की, गावोगावी गरीब, आदिवासी आणि सर्वसामान्य कुटुंबे प्रशासनाच्या दाव्यांना बळी पडत आहेत. पावसामुळे झालेल्या नुकसानीवर फक्त पंचनामा करून थातुरमातुर मदत जाहीर करण्याऐवजी खऱ्या अर्थाने तातडीची मदत व पुनर्वसनाची जबाबदारी प्रशासनाने स्वीकारली पाहिजे, अशी मागणी पीडितांकडून होत आहे.***

# बेणसेतील घर कोसळले, सुदैवाने सुतार कुटुंब बचावले

**पाली : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात मागील पाच दिवसांपासून धुवाधार पाऊस कोसळतोय, अतिवृष्टीने जिल्ह्यात अनेक ठिकाणी दरड व घरे कोसळण्याच्या घटना घडल्या.

पेण तालुक्यातील बेणसे येथे यमुनाबाई घासे यांचे घर सोसाट्याचा वादळवारा व मुसळधार पावसात कोसळले, घराची कौले फुटली. यावेळी घरात वास्तव्यास असलेले काशिनाथ सुतार यांचे कुटुंब या



आपत्तीत सुदैवाने बचावले. यावेळी गावकरी घटनेचे गांभीर्य पाहून मदतीला धावले. या दुर्घटनेत घरगुती साहित्याचे नुकसान झाले.

यावेळी बोलताना काशिनाथ सुतार म्हणाले की शिहू बेणसे विभागात देखील दिवसरात्र मुसळधार पाऊस कोसळत आहे. सोसाट्याचा वादळवारा व जोरदार पाऊस यामुळे आम्ही राहत असलेल्या घराचा काही भाग माझे कुटुंब गाढ झोपेत असताना कोसळला, मोठा आवाज झाल्याने सारे हादरून गेले, या घटनेत आम्हाला कुणाला दुखापत झाली नाही, साहित्याची मोडतोड झाली. शासनाने नुकसान भरपाई देण्याची मागणी काशिनाथ सुतार कुटुंबीयांनी केलीय.

# उन्मळलेल्या झाडाला दिले जीवनदान!

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव शहरातील मोरबा रोडवर रस्त्याच्या कडेला एक झाड उन्मळून निपचित पडले होते. कदाचित वय झाल्याने किंवा आतून सुकल्याने ते झाड मरणासन्न अवस्थेत आले असावे. नुकत्याच आलेल्या वादळवाऱ्यामुळे ते कोसळले, मात्र त्याच्या फांद्यांवरील हिरवळींनी अजूनही त्याच्या जगण्याची उमेद दाखवत होती.

मॉर्निंग वॉकदरम्यान जेष्ठ पत्रकार अरुण पवार आणि मित्र मारुती मालोरे, निशांत साठे व संदेश जाधव यांच्या मदतीने या झाडाला पुन्हा उभं करण्याचा निर्णय घेतला. त्या झाडाच्या एका बाजूच्या मुळाला आधार देऊन त्याला माती भरून मजबूत केलं. बाजूच्या झाडांच्या वेलींनी घट्टसर बांधणी करून या झाडाला नवसंजीवनी दिली.



पत्रकार अरुण पवार यांनी सांगितले की या उपक्रमातून मनाला एक विशेष समाधान लाभलं. याच मार्गावर याआधीही शेकडो झाडांना जीवनदान देण्याचे सामाजिक कार्य आम्ही केले आहे. झाडे वाचवणे म्हणजे निसर्गाचे रक्षण, आणि हेच आपले कर्तव्य असल्याची जाणीव यातून अधोरेखित झाली.

# थेरोंडा आगळेचीवाडीत कासवांना जिवदान



**रेवदंडा : प्रतिनिधी**

थेरोंडा आगळेचीवाडी बधाऱ्याजवळ आज दुपारी १२ वाजता स्थानिक युवक समुद्रावर फेरफटका मारायला गेले असता, समुद्रकिनारी खाडीलगत टाकलेल्या जाळ्यांमध्ये चक्क दोन मोठे कासव अडकलेले आढळले.

या घटनेची माहिती मिळताच सचिन बळी, सुशांत बळी, कुलदीप बळी, संजय जावसेन, महेश हाडके आणि सुधाकर हाडके या सहा युवकांनी तत्काळ धाव घेतली. जाळ्यात गुंतलेली कासवे तडफडत होती. मानवतेचा परिचय देत या तरुणांनी संयमाने जाळी सोडवून दोन्ही कासवांना वाचवले.

यानंतर त्यांनी ती कासवे परत थोड्या आत समुद्रात सोडून दिली. स्थानिक नागरिकांनी या तरुणांच्या संवेदनशीलतेचे आणि धाडसाचे कौतुक केले आहे.

समुद्रकिनाऱ्यावरील कासवे ही जैवविविधतेचा एक महत्त्वाचा भाग असून त्यांचे रक्षण करणे ही सर्वांची जबाबदारी असल्याचा संदेशही या घटनेतून अधोरेखित झाला. युवकांच्या या कृतीमुळे समुद्रकिनाऱ्यावरचा जीवदानाचा प्रसंग ग्रामस्थांच्या चर्चेचा विषय ठरला आहे.

# कालकाई माता सेवा संस्थेतर्फे विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्क

**पोलादपूर: प्रतिनिधी**

कालकाई माता सेवा संस्था कोतवाल बुद्रुक या सामाजिक, शैक्षणिक, क्षेत्रात गेली आठ वर्ष कार्यरत नोंदणीकृत संस्थेच्या ध्येय धोरणानुसार पोलादपूर तालुक्यातील गरीब व गरजू विद्यार्थ्यांच्या आर्थिक विवंचनेतुन ते शैक्षणिक प्रवाहातुन बाहेर जाऊ नयेत यासाठी सामाजिक दायित्व म्हणून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क भरण्याचे महत्वपूर्ण कार्य केले जात आहे.

कालकाई माता सेवा संस्था कोतवाल बुद्रुक या संस्थेने माऊली प्रशाला कोतवाल १५ विद्यार्थी, न्यू इंग्लिश विद्यालय ओंबळी २५ विद्यार्थी, न्यू इंग्लिश विद्यालय पैठण २८ विद्यार्थी, विद्यामंदिर पोलादपूर २८ विद्यार्थी, प्रभावती रामचंद्र शेठ विद्यालय पोलादपूर २७ विद्यार्थी, नरवीर तानाजी मालुसरे विद्यालय देवळे ११ विद्यार्थी, स्व.शांताराम शंकर जाधव न्यु इंग्लिश स्कूल पळचिल १८ विद्यार्थी, श्री. शंकरराव महाडिक इंग्लिश विद्यालय १० विद्यार्थी अशी विद्यालय निहाय विद्यार्थी संख्येची शैक्षणिक शुल्क धनादेशाने अदा केली.

यामध्ये प्रामुख्याने संस्थेचे विनय नायर आणि मित्र परिवार, पंखुडी कुमारी तसेच अभिजित जाधव यांचे सहकारी यांनी मोलाचे सहकार्य केले. सदर मदतीचा धनादेश शाळांकडे सुपुर्द करण्यात आले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष महेश दरेकर, कोतवाल बुद्रुकच्या सरपंच रेखा अनंत दळवी, प्रितीश दरेकर, पत्रकार शिवराज पार्टे यांच्यासह संस्थेचे पदाधिकारी, सभासद, हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## निविदा सुचना

महावितरण

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या संचालन व सुव्यवस्था विभाग, अलिबाग कार्यालयाअंतर्गत असणारे लघुदाब व उच्चदाब वाहिन्या यांच्या प्रतिबंधात्मक देखभाल व दुरुस्तीच्या कामासाठी वर्ष २०२५-२६च्या करारासाठी परवानाधारक विद्युत ठेकेदारांना ई-निविदा क्रमांक टी-१५, टी-१६/०८-२०२५ एकूण २ निविदा महावितरण कंपनीच्या https://etender.mahadiscom.in/eatApp/ संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आल्या आहेत. सदर निविदा विक्रीसाठी दि.२१.०८.२०२५ ते ०४.०९.२०२५ (दुपारी ०२.०० वा.) पर्यंत उपलब्ध राहतील. निविदा भरण्याची अंतिम तारिख दि. ०४.०९.२०२५ ला दुपारी ०३.०० वाजेपर्यंत आहे. निविदेच्या आवृत्तीत / शुद्धीपत्रातील कोणताही बदल यापुढे आमच्या संकेत स्थळावर प्रकाशित केला जाईल.

**PRO NO-225** — **कार्यकारी अभियंता, अलिबाग विभाग**

## जाहीर नोटीस

सर्व तमाम लोकांस जाहीर नोटीसीने असे कळविणेत येत आहे की, मौजे-पिसार्वे, ता-पनवेल, जि-रायगड, येथील खाली वर्णन केलेल्या व्यक्तीच्या मालकी हक्काची, मिळकत वा जमीन ही आमचे आशिलांनी कायमस्वरूपी विकण्याचे ठरविले आहे. तरी, सदरहू मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरीता प्रस्तुत जाहीर प्रसिध्द करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन येणेप्रमाणेः

**- मिळकतीचे वर्णण-**

**मौजेः पिसार्वे, तालुका-पनवेल, जिल्हा रायगड**

| गाव | भोगवटदारांचे नाव | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे आर.पॉ. | आकारणी रू.पै. |
|---|---|---|---|---|
| पिसार्वे | गोमा नामदेव म्हात्रे<br>सुरेश नामदेव म्हात्रे<br>नारायण नामदेव म्हात्रे<br>भाई नामदेव म्हात्रे | १२६/८ | ०.०७.००<br>०.०३.००<br>०.१०.०० | ०.१६ |

सदरहू जागा, जामिन व मिळकतीसंबंधी अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचे गहाण, दान, बक्षीस, लिज, पोटगी, कोर्ट जप्ती. अगर अन्य कोणत्याही प्रकारचे इजमेंट, दावे, फरोक्त, वचनचिठ्ठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, लिज, साठेकरार, कुलमुखत्यारपत्र, करार-मदार, हक्क, हितसंबंध असलेल्या व्यक्तींना, इतर वारसांचा वा संबंधीतांना ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्त्यावर, समक्ष तथा रजिस्टर पोस्टाने लेखी कळवावे. जर वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तक्रारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरून आमचे आशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजीत व्यवहार पूर्ण करतील व विहीत मुदतीच्या न येणा-या कोणत्याही हरकती/तक्रारी आमचे अशिलावर बंधनकारक असणार नाहीत याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल

दिनांकः २०/०८/२०२५

**सही/-**

**ॲड. चित्तरंजन सुधाकर लाड**

**पत्ता-०३, श्री हरेकृष्णा को. ऑ. सोसायटी, प्लॉट नं. १२, सेक्टर ०५, नविन पनवेल ता. पनवेल जि. रायगड ४१०२०६, मो. क्र. ९६९९४९९९६३**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की खालील परिष्टामध्ये वर्णन केलेली जमिन मिळकत माझे अशीलाने खरेदीखत करून प्रस्ताविक जमीन मालक श्री. दिपक तुकाराम भोपी या जमीन मालकांकडुन विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर वर्णीत जमीन मिळकत ही श्री. दिपक तुकाराम भोपी यांच्या प्रत्यक्ष वहीवाटीत व ताबे कब्जात आहे. तरी सदर जमिन मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरीता प्रस्तुत जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे हरिग्राम, तालुका पनवेल, जिल्हा रायगड.**

| गावाचे नाव | स.न./हि. न. | क्षेत्र आर.चौ.मी. | आकार |
|---|---|---|---|
| हरिग्राम | ४४/२/अ | ०-२१-०० | ४.११ |

प्राप्त परिस्थितीत वरील परिशिष्टामध्ये नमूद केलेल्या जमीन मिळकतीमध्ये वा कोणत्याही भागावर कोणाही व्यक्तीचे कसल्याही प्रकारचे करार-मदार, गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, तारण, भाडेकरुपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम.ओ.यु. वा तत्सम कोणतेही दावे, मालकी व अन्य हक्क हितसंबंध असल्यास त्या व्यक्तींनी वा संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी कळवावे अगर समक्ष येऊन भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे पक्षकार सदर मिळकतीचे हस्तांतरणाचे व्यवहाराचे काम पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या तक्रारी, दावे, हरकती या रद्दबातल आहेत व त्या जाणीवपूर्वक सोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

**ठिकाण : पनवेल**

**दिनांक : २०/८/२०२५**

**सही/-**

**ॲड. श्री. दीपक आर. शेळके**

**पत्ता : जी-३,१ किनारा हौसिंग सोसायटी पनवेल बावन बंगला पनवेल. जि. रायगड ४१०२०६**

**मो.नं. ९८२०७९५६०५**

राम प्रहर
वाचनीय बातम्या आणि जाहिरातींसाठी वाचा

## पनवेल महानगरपालिका शिक्षण विभाग

**लोकनेते दि. बा. पाटील विद्यालय,**

**आगरी समाज हॉल व दांडेकर हॉस्पिटल समोर, पनवेल- ४१० २०६.**

Email- msbpanvel1993 @ gmail.com — Email :panvelcorporation@gmail.com

### जाहिर सूचना

**पनवेल महानगरपालिकेच्या प्राथमिक शाळांतील इयत्ता ७ वी च्या एकूण २९३ विद्यार्थ्यांना एलिमेंटरी इंटरमिजिएट ड्रॉइंग ग्रेड परीक्षेसाठी चित्रकला किट उपलब्ध करुन द्यावयाची आहेत. याकामी इच्छुकांनी निविदा दर दि. २१.०८.२०२५ ते दि.२९.०८.२०२५ रोजी सायं. ३.०० वाजेपर्यंत महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाकडे सादर करावीत. सदर चित्रकला किटमधील साहित्याची सविस्तर यादी शिक्षण विभागाच्या कार्यालयात व पनवेल महानगरपालिकेच्या सांकेतिकस्थळावर उपलब्ध आहे.**

जा.क्र :-पमपा/जनसंपर्क./३१२५/प्र.क्र. ४०२/४०९/२०२५

दिनांक :- २०/०८/२०२५

**सही/-**
**गणपत माने**
**सहा. आयुक्त (शिक्षण)**
**पनवेल महानगरपालिका**

## सिडको

शहरांचे शिल्पकार

### जाहीर सूचना

सिडको महामंडळाच्या भूमी व भूमापन विभागातर्फे साडेबारा टक्के योजनेतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना भूखंडाचे वाटप करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून,खालील तपशीलानुसार संबंधिताना भूखंडाचे **वाटपपत्र/ करारनामा** प्रस्तावित आहे.

| अ. क्र. | नोड व संचिका क्र. | गाव व निवाडा क्र. | सर्व्हे / हिस्सा क्र. | संपादित क्षेत्र (हे.आर.) | मंजूर पात्रता (हे.आर.) | करारनामा करण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती | करारनामा संबंधित भूधारक व त्यांचे कायदेशीर वारसांची माहिती | संचिकेतील उपलब्ध माहिती व सद्य:स्थितीनुसार संपादित जमिनीशी संबंधित न्यायालयीन दाव्यांची माहिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | **ता.पनवेल, जि.रायगड** | | | | |
| १ | उलवे २०१० | तरघर १०९ | ४७/१<br>४७/५<br>४२/१+<br>+५+६<br>+७/२ | ०-२५-०<br>१-०६-० | ११५० चौ.मी. पैकी १५० | उलवे नोड येथील भूखंड क्र.८A, सेक्टर-१८, क्षेत्र-४४९.५६ चौ.मी. | मूळ भूधारक **कै. महादेव काळया मोकल (मयत), कै. आनंदी उर्फ आनंदीबाई महादेव मोकल (मयत), कै. नामदेव महादेव मोकल (मयत) व कै. शैलेश नामदेव मोकल (मयत) यांचे वारस** १) श्री. राजेश नामदेव मोकल, २) श्रीमती लक्ष्मीबाई नामदेव मोकल, ३) श्रीमती सुषमा शैलेश मोकल, ४) कु. दिक्षा शैलेश मोकल व ५) कु. महर्षी शैलेश मोकल | |
| २ | खारघर १८३ | खारघर -२७<br>खारघर -३१८<br>खारघर -३१८<br>खारघर -२८<br>खारघर -२८<br>खारघर -४०७ब | १५५/१८<br>३१४/३<br>३१४/९<br>२९५/२<br>२००/१ ते ८ब<br>१९८/४<br>२०४/३<br>२११अ/४ | ०-१०-४<br>०-०२-३<br>०-०२-५<br>०-२९-३<br>०-३८-४<br>०-०४-५<br>०-०८-१<br>०-४९-५ | १२९० चौ.मी. पैकी ४४९.८६ वाटप पूर्ण ८४० चौ.मी. | भूखंड क्र.२३१, सेक्टर-१०, क्षेत्र - ८४० चौ.मी. | कै.शेवंताबाई अर्जुन ठाकूर (मयत) वारस-<br>१)श्री.भगवान अर्जुन ठाकूर<br>**२)विष्णू अजुर्न ठाकूर (मयत)**<br>२.१) श्रीमती. जनाबाई विष्णु ठाकूर<br>२.२)श्री.गगन विष्णु ठाकूर<br>२.३)श्री.धर्मेंद्र विष्णु ठाकूर<br>२.४) श्री.अमृत विष्णू ठाकूर<br>२.५) श्रीमती. सुवर्णा चिंतामण गायकर<br>३) श्री.कैलास अर्जुन ठाकूर (मयत)<br>३.१) श्रीमती. कांता कैलास ठाकूर<br>३.२) तनुजा कैलास ठाकूर उर्फ सौ.तनुजा राहुल कोळी<br>**४)श्रीमती.जिजाबाई राम करावकर (मयत)**<br>४.१) श्री.संतोष रामचंद्र करावकर<br>४.२) सौ.सुगंधा राजाराम आलिमकर<br>४.३) सौ.सुनिता नारायण फडके<br>४.४) सौ.आशा साईनाथ पाटील<br>४.५) सौ.उषा कैलास म्हसकर<br>४.६) सौ.बबिता प्रल्हाद केणी<br>४.७) सौ.हिरा बाळकृष्ण भोईर<br>४.८) सौ.दिपाली विक्रम ठाकूर<br>५)श्रीमती.करूणा अर्जुन ठाकूर | निरंक |

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितांनी नोंद घ्यावी की, संबंधित संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा/हरकती प्रलंबित आहे, तसेच भूधारकांच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसांच्या नावाचा जाहीर सुचनेप्रमाणे प्रसिध्द झालेल्या मजकुरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितांनी सदर जाहीर सुचना प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पुरक कागदपत्रासह निदर्शनास आणावी. सदर अर्जासह पुरक कागदपत्रांची तपासणी करून वाटपपत्र करून देण्याबाबत पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून, अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जाची दखल घेण्यात येणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी, ही विनंती.

**अर्ज सादर करण्याचे ठिकाण :-** **मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**
**१२.५ टक्के भूमी विभाग,**
**सिडको भवन, तळ मजला,**
**सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.**

**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574

www.cidco.maharashtra.gov.in

सिडको/जनसंपर्क/२२५/२०२५-२६

# अतिवृष्टीच्या काळात नवी मुंबई मनपा सज्ज

**नवी मुंबई : बातमीदार**

ठाणे जिल्ह्याला १९ ऑगस्ट २०२५ रोजी रेड अलर्ट जाहीर करण्यात आलेला आहे व मध्यरात्रीपासून पावसाचा जोर वाढला होता. या पार्श्वभूमीवर महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार महानगरपालिकेची आपत्कालीन मदत यंत्रणा सर्वच विभाग कार्यालय क्षेत्रात मदतीसाठी दक्षतेने कार्यरत असून आयुक्त स्वत: शहरातील परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून होत्या.

नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात ठिकठिकाणी अत्याधुनिक एचडी सीसीटिव्ही कॅमेरे लावण्यात आलेले असून महापालिका मुख्यालयातील अद्ययावत इंटिग्रेटेड कमांड कन्ट्रोल सेंटर याव्दारे शहरातील स्थितीवर निरीक्षण व नियंत्रण ठेवले जात आहे. आयुक्तांनी या नियंत्रण कक्षाला भेट देत विविध विभागातील निरनिराळ्या ठिकाणावरील परिस्थितीची सकाळीच पाहणी केली व संबधितांना उचित व तत्पर कार्यवाहीचे निर्देश दिले.



कमी वेळेत मोठया प्रमाणात सातत्याने पर्जन्यवृष्टी झाल्याने शहरातील काही सखल भागात पाणी साचल्याचे निदर्शनास आले. मात्र त्याठिकाणी अतिरिक्त पाणी उपसा पंप व वाहून जाणा-या पाण्यामध्ये वॉटर एन्ट्रीजच्या ठिकाणी जमा झालेले अडथळे दूर करुन प्रवाह वाहता करण्यात आला. तसेच ५ ठिकाणी झाडे पडल्याने रहदारीला येणारे अडथळे तत्परतेने दूर करण्याकडे विशेष लक्ष पुरविण्यात आले.

मागील पाच दिवसात १५ ऑगस्ट रोजी सकाळी ८.३० पासून १९ ऑगस्ट सकाळी ८.३० पर्यंत नवी मुंबईत ५४०.५७ मिमी. इतक्या मोठया प्रमाणात सातत्याने पर्ज्यन्यवृष्टी झाली असून अशा परिस्थितीतही इतर शहरांच्या तुलनेत नवी मुंबईतील जनजीवन सुस्थितीत होते.

नवी मुंबई महापालिका क्षेत्रात पाणी साचण्याची ठिकाणे तुरळक असून ती प्रामुख्याने पूर्वेकडील डोंगरामधून येणाऱ्या नैसर्गिक नाल्यांच्या प्रवाहात अतिवृष्टीमुळे पाण्याची वाढ होत असल्याने त्या आसपासच्या भागातील आहेत. तसेच नवी मुंबई हे समुद्रसपाटीपासून खालच्या पातळीवर वसलेले शहर असल्याने काही सखल भागात भरतीच्या काळात अतिवृष्टी झाल्यास काही प्रमाणात पाणी साचते. मंगळवारी सकाळी ९.१५ वा. ३.७५ मिटरची भरती असल्याने काही सखल ठिकाणी भरती ओसरेपर्यंतच्या कालावधीत पाणी साचून राहिल्याचे निदर्शनास आले. मात्र ही तुरळक ठिकाणे वगळता शहरामध्ये इतरत्र पाणी साचले नाही.

यादवनगर आदिवासी पाडा व ट्रक टर्मिनल समोरील खोल भागात लगतच्या डोंगरावरील पाणी साचून आश्रम वस्तीत येत होते. त्याठिकाणी जेसीबी लावून बांध घालण्यात आला व पाण्याचा प्रवाह नाल्याकडे प्रवाहित करण्यात आला. तसेच महापे मिलिनियम बिझनेस पार्क समोर, एमआयडीसी भागात जेसीबीव्दारे ड्रेबीज काढून पाण्याला मोकळी वाट करून देण्यात आली व बंदिस्त झालेल्या वॉटरएन्ट्रीज खुल्या करण्यात आल्या.

तुर्भे एमआयडीसी मुख्य रस्ता इंदिरानगर, घणसोली नोसिलनाका ब्रिजजवळील मुख्य रस्त्यावरील कॉर्नर, ऐरोली भारत बिजली जवळील कॉर्नर, कृष्णावाडी दिघा, कृष्णा स्टील झोपडपट्टी तुर्भे अशा डोंगर भागाकडून पाणी वाहत येणाऱ्या ठिकाणी पाणी साचल्याचे निदर्शनास आल्यानंतर त्याठिकाणी वाहत्या पाण्यातील अडथळे दूर करुन साचलेल्या पाण्याचा निचरा होण्यासाठी कार्यवाही करण्यात आली.

सातत्याने पर्जन्यवृष्टी सुरु असल्याने शहरातील वाहतुक व रहदारी काही ठिकाणी संथ गतीने सुरळीत सुरू आहे तसेच एनएमएमटी बसेसही प्रवासी सेवा पुरवित आहेत.

### घाबरून न जाता सतर्क रहा; नागरिकांना आवाहन

नवी मुंबई महानगरपालिकेची आपत्कालीन मदत यंत्रणा आठही विभाग कार्यालय क्षेत्रात दक्षतेने कार्यरत आहे. नागरिकांनी घाबरून न जाता कोणत्याही प्रकारच्या मदतीसाठी नवी मुंबई महानगरपालिकेच्या नजिकच्या विभाग कार्यालयातील आपत्कालीन कक्षाशी अथवा महानगरपालिका मुख्यालयातील मध्यवर्ती आपत्ती व्यवस्थापन केंद्राशी २७५६७०६० / २७५६७०६१ या क्रमांकावर अथवा १८००२२२३०९ /२३१० या टोल फ्री क्रमांकांवर संपर्क साधावा असे आवाहन महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या वतीने करण्यात येत आहे.

## प्लास्टिकमुक्त गणेशोत्सव स्पर्धा २०२४चे पारितोषिक वितरण



**नवी मुंबई : बातमीदार**

हवामानात व पर्जन्यमानात झपाट्याने होणाऱ्या बदलांचे परिणाम आपण सारेजण अनुभवत आहोत, हे सुरळीत करण्यासाठी निसर्गाचे संरक्षण आणि संवर्धन करण्याकडे प्रत्येकानेच काटेकोर लक्ष देण्याची गरज आहे. त्या पार्श्वभूमीवर येणारा गणेशोत्सव आपण आनंदात व उत्साहात साजरा करतानाच निसर्गाचे भान ठेवून पर्यावरणपूरक व प्लास्टिकमुक्त साजरा करावा, असे आवाहन महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी केले.

नवी मुंबई महापालिकेच्या वतीने स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेल्या गतवर्षीच्या नवी मुंबई महानगरपालिका क्रीडा व सांस्कृतिक कार्य विभाग आयोजित 'पर्यावरणपूरक व प्लास्टिकमुक्त श्रीगणेशोत्सव स्पर्धा २०२४' च्या पारितोषिक वितरण समारंभप्रसंगी ते बोलत होते.

याप्रसंगी व्यासपीठावर रेवती शिंदे तसेच अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार, शहर अभियंता शिरीष आरदवाड, सहा. संचालक नगररचना सोमनाथ केकाण, परिमंडळ १ उपआयुक्त सोमनाथ पोटरे, समाजविकास उपआयुक्त किसनराव पलांडे, वैद्यकिय आरोग्य अधिकारी डॉ.प्रशांत जवादे, अतिक्रमण विभागाचे उपआयुक्त डॉ.कैलास गायकवाड, अति.शहर अभियंता अरविंद शिंदे, घनकचरा व्यवस्थापन विभाग उपआयुक्त डॉ.अजय गडदे व स्मिता काळे, महापालिका सचिव चित्रा बाविस्कर, क्रीडा व सांस्कृतिक विभाग उपआयुक्त अभिलाषा म्हात्रे आणि इतर अधिकारी उपस्थित होते.

गतवर्षीच्या 'पर्यावरणपूरक व प्लास्टिकमुक्त श्रीगणेशोत्सव स्पर्धा २०२४' मधील सर्वप्रथम क्रमांकाने विजेते सेक्टर १७ कोपरखैरणे येथील मोरया सांस्कृतिक कला व क्रीडा निकेतन गणेशोत्सव मंडळास रू.२५ हजार आणि सन्मानचिन्ह प्रदान करून गौरविण्यात आले. सर्वच विजेत्या मंडळांना रक्कमेच्या पारितोषिकासह स्मृतीचिन्हे प्रदान करण्यात आली. सेक्टर १० नेरूळ येथील नवयुग उत्सव मित्र मंडळ हे व्दितीय तसेच सेक्टर २० तुर्भे येथील शिवछाया मित्र मंडळ तुर्भे तृतीय क्रमांकाचे मानकरी ठरले.

संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज यांच्या ७५० व्या जयंती वर्षाचे औचित्य साधून नमुंमपा मुख्यालयातील म्फिथिएटरमध्ये आयोजित सुप्रसिध्द गायक श्री.मंगेश बोरगांवकर यांच्या 'भक्तिरंग' या अभंग व भक्ती गीत स्वरयात्रेनंतर पारितोषिक वितरण समारंभ झालेल्या गणेशोत्सव मंडळाचे उपस्थित पदाधिकारीही स्वरसंध्येत उत्साहाने सहभागी झाले होते.

## उर्गेन संघरक्षित यांचा जन्मशताब्दी महोत्सव



**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

त्रिरत्न बौद्ध महासंघ मुंबई विभाग अंतर्गत मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, उल्हासनगर आणि नवी मुंबई केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने त्रिरत्न बौद्ध महासंघ या जागतिक धम्म संघाचे संस्थापक उर्गेन संघरक्षित यांचा जन्म शताब्दी महोत्सव साजरा करण्यात येत आहे.

यानिमित्त २६ ऑगस्ट २०२५ रोजी विष्णुदास भावे नाट्यगृह वाशी येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. यात सायंकाळी पाच वाजता अश्वघोष सांस्कृतिक कार्यक्रम तर सायंकाळी सात वाजता सुप्रसिद्ध धम्मचारी लोकमित्र यांचे जाहीर धम्मप्रवचन होणार आहे. या महोत्सवात धम्मचारी चंद्रबोधि, धम्मचारी बोधिसेन, धम्मचारी अनोमदस्सी, हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. महोत्सवात मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, उल्हासनगर, रायगड, नवी मुंबई आदी ठिकाणाहून येणारे धम्म उपासक सहभागी होणार आहेत. या कार्यक्रमात मुंबई विभागातील जास्तीत जास्त धम्म उपासकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन त्रिरत्न बौद्ध महासंघ मुंबई विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

## विघ्नहर्ता पुरस्कार वितरण समारंभ

**पनवेल : वार्ताहर**

नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या वतीने 'सार्वजनिक गणेशोत्सव २०२४' मधील उत्कृष्ट गणेश मंडळांना विघ्नहर्ता पुरस्कार प्रदान करण्यात आले. हा पुरस्कार वितरण सोहळा पनवेल येथील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात मंगळवारी झाला.

हा कार्यक्रम पोलीस उपायुक्त, परिमंडळ ३चे प्रशांत मोहिते यांच्या अध्यक्षतेखाली संप्पन जहाल असून या वेळी भाजपनेतेजयंत पगडे, माजी नगरसेवक अजय बहिरा, पनवेल महानगरपालिकेचे उपयुक्त वैभव विधाते, सहाय्यक पोलीस आयुक्त भाऊसाहेब ढोले, पोलीस आयुक्त विक्रम कदम आदी उपस्थित होते.



या कार्यक्रमात विविध गटांतील विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षीस देऊन सन्मानित करण्यात आले. उत्कृष्ट गणेशमूर्ती गटात प्रथम क्रमांक श्री गणेश उत्सव मंडळ, स्वामी विवेकानंद चौक, उरण तर द्रितीय क्रमांक श्री गणेश मित्र मंडळ, सेक्टर ३४, कामोठे यांनी पटकावला. उत्कृष्ट कार्यक्रम व सामाजिक उपक्रम गटात प्रथम क्रमांक शंभो मित्रमंडळ, सेक्टर ३५, कामोठे, आणि द्रितीय क्रमांक गणेश मित्र मंडळ, सेक्टर १८, खारघर यांनी मिळवला. शिस्तबद्ध गणेश विसर्जन मिरवणूक गटात प्रथम क्रमांक जय दुर्गा क्रीडा व ग्रामविकास तरुण मंडळ, रोहिंजण, तळोजा तर द्रितीय क्रमांक अभिनव युवक मित्र मंडळ, पायोनियर विभाग, पनवेल यांनी पटकावला. उत्कृष्ट देखावा या गटात प्रथम क्रमांक राजे शिवाजीनगर रहिवाशी सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ, कळंबोली आणि द्रितीय क्रमांक एकविरा मित्र मंडळ, तक्का, पनवेल यांना मिळाला. सर्वोत्कृष्ट गणेश मंडळ गटात प्रथम क्रमांक जय हनुमान सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ, रिटघर तर द्रितीय क्रमांक अनमोल जीवन वेलफेअर असोसिएशन, उलवे यांना मिळाला. यावेळी पनवेल कोळीवाडा येथे विसर्जनासाठी मदत करणाऱ्या स्वयंसेवकांचा आणि परीक्षक मंडळाचा सत्कार करण्यात आला.

यामध्ये अॅड. सुरेश बोंद्रे, दत्तात्रय सुळेभाविकर, शामल आंग्रे, कविता ठाकूर, अॅड. संतोषी चव्हाण, आणि अॅड. सतिश देशमुख यांचा समावेश होता.

## संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांची जयंती साजरी; माऊलींची पालखी मिरवणूक

**नवी मुंबई : बातमीदार**

संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज यांचे सन २०२५ हे वर्ष सप्तशतकोत्तर सुवर्णमहोत्सवी (७५०) जयंती वर्ष असून यानिमित्त मुख्यमंत्री महोदयांच्या संकल्पनेनुसार महाराष्ट्र शासनामार्फत निर्गमित परिपत्रकाच्या अनुषंगाने नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली अत्यंत उत्साहात ज्ञानेश्वर माऊलींचा जयंती उत्सव साजरा करण्यात आला.

या वेळी सजवलेल्या पालखीत ठेवलेल्या श्री ज्ञानेश्वर माऊलींच्या प्रतिमेचे व ज्ञानेश्वरी ग्रंथाचे पूजन करून महापालिका मुख्यालयातून दिंडी स्वरूपातील मिरवणुकीला प्रारंभ करण्यात आला. संत ज्ञानेश्वरांच्या वेशभूषेतील विद्यार्थी सर्वांचे लक्ष वेधून घेत होता. टाळ-मृदुगांच्या गजरात, लेझिम पथकासह मुख्यालयासमोरील सेवारस्त्याने निघालेल्या दिंडीमध्ये आबालवृध्द नागरिक मोठ्या संख्येने सहभागी होते. विशेषत्वाने ज्ञानदीप सेवा मंडळाच्या प्राथमिक माध्यमिक विद्यालयाचे विद्यार्थी - विद्यार्थिनी मुख्याध्यापक रत्नाकर तांडेल यांच्या मार्गदर्शनाखाली वारकरी वेशात लेझीम पथकासह दिंडीत सहभागी होते. युवक, युवतींचाही दिंडीत लक्षणीय सहभाग होता.



'पुंडलिका वरदे हरी विठ्ठल', 'ज्ञानोबा माऊली तुकाराम', 'जय जय राम कृष्ण हरी' या नामगजरासह दिंडीत सहभागी ज्ञानाई प्रासादिक भज मंडळ करावे यांचे भजनीबुवा पंढरीनाथ भोईर,विजय नाईक, रविंद्र भोईर तसेच नेरूळचे अमृत पाटील या वारकरी बुवांनी तसेच पत्रकार श्री.मनोज जालनावाला यांनी अभंगांचे गायन करीत दिंडीला भावस्वर प्रदान केला.

अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार यांच्यासह अनेक अधिकारी, कर्मचारीही दिंडीमध्ये शुभ्रधवल वारकरी वेश परिधान करून सहभागी झाले होते.

विशेष म्हणजे रस्त्यामध्ये ठिकठिकाणी थांबून तसेच मुख्यालयाच्या प्रांगणात रिंगण घालत फुगड्या, झिम्मा सारखे दिंडीतील खेळही खेळण्यात आले. ज्ञानेश्वर महाराजांच्या पसायदानाने दिंडीची भावपूर्ण सांगता झाली.

## करंजाडेकरांची शिवनेरी वारी

**पनवेल : वार्ताहर**

छत्रपतींचा आदर्श, विचार समोर ठेवून करंजाडेतील जनसामान्यात रुजावे आणि आदर्श समाज निर्माण व्हावा यासाठी गडकिल्ले संवर्धन आणि दर्शन नियोजन करण्यात येते. या मोहिमेत युनेस्कोने घोषित केलेल्या UNISCO WORLD HERITAGE SITE (जागतिक वारसा स्थळ) वरील दुर्गराज रायगड वारी, किल्ले लोहगड दर्शन व १३५ शिवभक्तांच्या सहभागातून शिवनेरी दर्शन मोहीम पार पडली.

करंजाडेमधील रहिवाश्यांनी किल्ले शिवनेरीवर इतिहासिक वास्तू पहिल्या व अनुभव घेतला. शिवाई देवीचे दर्शन घेऊन आशिर्वाद घेतला. किल्ले शिवनेरी दर्शन मध्ये ३ एसी बस व चारचाकी वाहन समावेश होती. नाष्टा, जेवण, फळ, बिस्कीट, चॉकलेट व पाण्याची उत्तम सोय करण्यात आली. तसेच भगवान शिवभक्त म्हणून चार शिवभक्तांना विठ्ठल रुक्मिणी व भक्ती शक्ती मूर्ती देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच महाराजांच्या इतिहासाबद्दल प्रश्न विचारून विजयी शिवभक्तांचा सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. छत्रपती शिवाजीचा इतिहास व्याख्यानातून सांगून वैदेही मोरे यांनी सर्वांची मने जिंकली.

सह्याद्रीच्या प्रवासातील अविस्मरणीय अनुभव करंजाडेकरांनी अनुभवला प्रथमेश भास्कर पुंडे आणि सहकाऱ्यांच्या पाठीवर शाबासकीची थाप टाकत पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.तसेच योग्य नियोजन, मार्गदर्शन, नेतृत्व क्षमता यामुळे किल्ले शिवनेरी प्रवास सुखरूप झाला. अश्या भावना उपस्थितांनी व्यक्त केल्या.



## केविन डायस यांच्या वॉटरकलर चित्रांची पेंटिंग प्रदर्शनात निवड

### इन्फिनिटी स्ट्रोक्सतर्फे २५ ऑगस्टपर्यंत प्रदर्शन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल, नवी मुंबई, महाराष्ट्र येथील कलाकार केविन डायस यांच्या तीन वॉटरकलर चित्रांची निवड या प्रतिष्ठित प्रदर्शनासाठी झाली आहे.

Infinite Strokes प्रदर्शनात भारतभरातील ६० उत्कृष्ट कलाकारांना एका छताखाली आणले आहे. प्रत्येक कलाकाराचा प्रवास, त्यांचा स्वतंत्र आवाज आणि त्यांची कलात्मक दृष्टी प्रत्येक कलाकृतीत नवा अर्थ आणि जीवन ओतते.






मुंबईपासून कोलकाता, चेन्नईपासून काश्मीरमधील सोपोरपर्यंत - हे प्रदर्शन आपल्या वैविध्यपूर्ण, उत्साही आणि सृजनशील कला समुदायाचा उत्सव साजरा करते. केविन डायस हे हिना भट्ट आर्ट व्हेंचर्स यांनी आयोजित केलेल्या लॉकडाऊन पँडेमिक पेंटिंग स्पर्धेचे विजेते ठरले होते. या प्रदर्शनातील प्रत्येक कलाकृतीची निर्मिती त्या स्पर्धेत झाली असून त्या कलाकृती एकांत, परिवर्तन आणि धैर्याचे क्षण प्रकट करतात.

हे प्रदर्शन नेहरू सेंटर आर्ट गॅलरी, वर्ली, मुंबई येथे १९ ते २५ ऑगस्ट २०२५ या कालावधीत, दररोज सकाळी ११ ते संध्याकाळी ६ वाजेपर्यंत भरविण्यात येणार आहे. या प्रदर्शनाचे क्युरेशन हिना भट्ट आर्ट व्हेंचर्स यांनी केले आहे.




## जेव्हा तुझ्यावरील प्रेमाला महापूर येतो...

जेव्हा तुझ्यावरील प्रेमाला महापूर येतो,
पूर्ण गाव ओलाचिंब होतो...
मनातील भावनांना वाहून नेतो,
आठवांचा चिखल सोडून जातो...।।१।।
कोसळणारा थेंबाबर थेंब,
आपल्यातील अंतर मिटवून टाकतो...
झेपावत आलेला तो मेघ,
सारी बंधने झाकोळून ठेवतो...
दुखऱ्या सलांवर हलकेच फुंकर घालतो,
तुझ्याच विचारात कित्येक रात्री जागून काढतो...
जेव्हा तुझ्यावरील प्रेमाला महापूर येतो...।।२।।
अचानक वीज निघून जाते,
काळोखात वेड्यागत फिरतो...
तुझ्यापाशी जाणाऱ्या चिखलाने माखलेल्या रस्त्यांवर,
तुझ्याच पायांचे ठसे शोधत असतो...
जेव्हा तुझ्यावरील प्रेमाला महापूर येतो...।।३।।
ढगांच्या गडगडाटालाही आवाज नसतो,
विजांच्या कडकडाटालाही लखलखाट नसतो...
फक्त डोळ्यांसमोर तुझा चेहरा
अन तुझी हाक ऐकत असतो,
वावटळीतून वाट काढत कसाबसा
तुझ्यापर्यंत पोहोचतो...
जेव्हा तुझ्यावरील प्रेमाला महापूर येतो...।।४।।
पावसापुढे नेहमी माझाच हट्ट जिंकतो,
शेवटी हा ऋतूच तुझी भेट घडवतो...
अचानक पक्ष्यांचा किलबिलाट होतो,
नभातून इंद्रधनू चौफेर रंग उधळतो...
तेव्हा तुझ्यावरील प्रेमाचा महापूर ओसरतो...।।५।।
या भेटीनंतर पुढील भेट होईस्तोवर,
पुन्हा-पुन्हा तुझ्यावरील प्रेमाला महापूर येतो...
मला तुझ्यापर्यंत सोडून शांत होतो,
म्हणून हाच ऋतू तुझ्यासारखा जवळचा वाटतो...
सरींसोबत तुझ्या येण्याची चाहूल देऊन जातो...
सरींसोबत तुझ्या येण्याची चाहूल देऊन जातो...।।६।।



-योगेश मुकादम, पनवेल

# कशेडी घाटातील जुन्या महामार्गावरील खचलेल्या 'डेंजर झोन'मध्ये कोसळली दरड

**पोलादपूर : प्रतिनिधी**

मुंबई गोवा महामार्गावरील कशेडी घाटातील भोगाव गावच्या हद्दीतील सन २००५ पासून सातत्याने रस्ता खचण्याने डेंजर झोन म्हणून ओळखला जाणारा रस्ता आणखी खचला असून या ठिकाणी मंगळवारी दरडदेखील कोसळली आहे.



यंदा अवकाळी पाऊस सुरू झाल्यापासून मुंबई गोवा महामार्गाचे चौपदरीकरण झालेल्या एन एच ६६ या नवीन महामार्गावर तर कधी जुन्या एन एच १७ महामार्गावर दरडी कोसळत आहेत. भोगाव गावाच्या हद्दीतील सातत्याने खोल खचर्णाय़ा रस्त्यावर आज दरड कोसळली असून हा डेंजर झोन म्हणून ओळखला जाणारा रस्ता देखील नेहमीपेक्षा जास्त खचल्याचे दिसून आले.

मे २००५ मध्ये खेड येथील एका कन्स्ट्रक्शन कंपनीने या डेंजर झोनमध्ये मोरीसाठी ब्लास्टींग केल्यानंतर साधारणपणे ९० ते १०५ मीटर लांब अंतराचा रस्ता १० फुटांपेक्षा अधिक खोल खचला आहे. आतापर्यंत कोट्यवधी रुपयांची मलमपट्टी झालेल्या या रस्त्यावर मंगळवारी दरड कोसळली आहे.

या घटनेबाबत राष्ट्रीय महामार्ग बांधकाम विभाग व प्रशासनाकडून दुर्लक्ष झाल्याने भोगाव, कातळी बंगला पळचिल व गोलदरा या भागातील स्थानिक नागरिक आणि प्रवासी जनतेकडून तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

या ठिकाणी अवकाळी पावसामुळे आणि जून महिन्यातही सुरू असणारे रस्ता दुरुस्तीचे काम ठेकेदार आणि महामार्ग प्रशासनाकडून धीम्या गतीने सुरू असलेले काम काही कालावधीनंतर बंद झाले आहे. या डेंजर झोनमध्ये तातडीने आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास जेसीबी उभा करण्यात आला होता. तो देखील हलविण्यात आला आहे.

येत्या आठ दिवसावर कोकणवासीयांना प्रिय गौरी गणपतीचा सण येणार असताना या ठिकाणी सातत्याने खचणारा डेंजर झोन महामार्ग आणि त्यावर कोसळणाऱ्या दरडी यामुळे नजिकच्या काळात मोठी दूर्घटना झाल्यास या परिसरातील २६ गाव व वाडी वस्तीतील जनतेचा धोकादायक मार्गावरून सुरू असणारा दररोजचा प्रवास जीवघेणा ठरण्याची शक्यता लक्षात घेता यावर तातडीने उपाययोजना करण्याची आवश्यकता व्यक्त होत आहे.

यंदा जुलै महिन्याच्या पहिल्या आठवड्यात पळचिल येथील माजी उपसरपंच उमेश मोरे यांनी बांधकाम प्रशासन व तहसीलदार कपिल घोरपडे यांच्याशी संपर्क साधून विनंती केली असता तहसीलदार घोरपडे यांनी तात्काळ दखल घेऊन या मार्गावर तडे गेलेले रस्त्याची पाहणी करून खचलेल्या भोगाव हद्दीतील रस्त्याची पाहणी करून संबंधितांना तात्काळ रस्ता दुरुस्तीचे आदेश दिले होते. नेहमीप्रमाणे या ठिकाणी तात्पुरती मलमपट्टी करण्यात येऊन या भेटीचा गाजावाजा मोठ्या प्रमाणात झाला. मात्र, डेंजर झोनची धोकादायक परिस्थिती जैसे थे असल्याने जनतेतून नाराजी व्यक्त होत आहे. पोलादपूर तालुक्यात गेले तीन दिवस संततधार सुरू असल्याने हा डेंजर झोन रस्ता पुन्हा खोल खचला असून याच ठिकाणी आज दरड कोसळून एक भला मोठा दगड रस्त्यावर आल्याने प्रशासन जनतेचा बळी गेल्यानंतर जागे होणार काय अशी संतप्त भावना व्यक्त होत आहे. आयआयटीच्या तज्ज्ञांमार्फत सतत खचर्णाय़ा डेंजर झोनची कायमस्वरूपी दुरुस्ती करण्याची भाषा राष्ट्रीय महामार्ग बांधकाम विभागामार्फत करण्यात आली आहे. मात्र, दरवर्षीप्रमाणे यंदाही हा डेंजर झोन खचत असून आज लगतच्या डोंगरातून मोठ्या दगडासह दरडही कोसळल्याने याठिकाणी भेटी देऊन आदेश देर्णाय़ांचा फोलपणा उघड झाला आहे.

# श्रीवर्धन तालुक्यात विजेचा खेळखंडोबा

**श्रीवर्धन : बातमीदार**

श्रीवर्धन तालुक्यात पाऊस सुरू झाल्यानंतर नेहमीच महावितरण कडून वीजपुरवठा खंडित करण्यात येतो. याची अनेक कारणे असतात. काही वेळेला वीजा चमकत असतील किंवा वारा सुटला असेल तर महावितरण कंपनी वीजपुरवठा खंडित करते. तर अनेक वेळा पावसामुळे वीज वितरणात बिघाड होतात. पावसाळा सुरू होण्याअगोदर महावितरण कडून अनेक वेळा पावसाळ्यापूर्वीची देखभाल व दुरुस्ती यासाठी आठवड्यातून दोन दोन वेळा संपूर्ण दिवसभर वीज पुरवठा खंडित ठेवण्यात येतो. या वेळी खरोखर देखभाल व दुरुस्ती केली जाते, की छुप्या पद्धतीने भारनियमन केले जाते. हा प्रश्न वीज ग्राहकांना पडला आहे.

कारण अनेक वेळा देखभाल व दुरुस्तीची कामे करून सुद्धा, त्याचप्रमाणे अनेक वेळा वीज वाहकतारांच्या आजूबाजूच्या झाडांच्या फांद्या तोडून सुद्धा, थोडासा पाऊस पडला तरी वीज पुरवठा खंडित होतो. काही वर्षांपूर्वी पाभरे येथून श्रीवर्धन कडे येणारी वीज वाहिनी हॉटेल रवी प्रभा या नेरूळ गावाजवळ असलेल्या ठिकाणापर्यंत भूमिगत टाकण्यात आली होती. मात्र म्हसळा श्रीवर्धन मार्गाचे रुंदीकरणाचे काम करताना सदर भूमिगत वीज वाहिनी खराब झाली आहे. त्यामुळे महावितरणने एवढा खर्च करून देखील श्रीवर्धन वासीयांच्या माथी अंधारच ठेवला आहे.

आगामी काळात गणेशोत्सव, शारदीय नवरात्रोत्सव हे सण येणार आहेत. यावेळी तरी वीज पुरवठा व्यवस्थित सुरू राहावा, याबाबत महावितरणच्या अधिकाऱ्यांनी काळजी घेणे आवश्यक आहे.,

पाभरे येथून श्रीवर्धन कडे येणाऱ्या विद्युत वाहिन्या या काही ठिकाणी खाडीमार्गातून आलेल्या आहेत.त्यामुळे नेहमी त्याच ठिकाणी बिघाड होतो. त्यामुळे सदरचे काम करण्यासाठी खूप वेळ लागत असल्याने श्रीवर्धन तालुका अंधारामध्ये राहण्याचा प्रकार घडत असतो. तरी महावितरणच्या अधिकाऱ्यांनी वीज पुरवठा नेहमी सुरळीत राहील. याकडे जास्तीत जास्त लक्ष द्यावे अशी मागणी केली जात आहे.

## वडगांव पंचायत समिती अध्यक्षपदी विनोद भोईर

**चौक : प्रतिनिधी**

वडगांव पंचायत समिती अध्यक्षपदी विनोद भोईर यांची निवड झाल्याने कार्यकर्ते यांच्यात आणि विभागात समाधान व्यक्त करण्यात येत आहे. विनोद भोईर हे भारतीय जनता पक्षाचे सक्रिय कार्यकर्ते असून, अनेक सामाजिक कार्यात त्यांचा सहभाग असून, दानशूर व्यक्ती म्हणूनच ते परिचित आहेत. मागील विधानसभा निवडणुकीत त्यांनी वडगांव आणि चौक परिसरात अत्यंत महत्त्वाचे काम करून आमदार महेश बालदी यांच्या विजयात मोलाचं वाटा आहे. विनोद भोईर यांच्या निवडीने चौक वडगांव परिसरातील भारतीय जनता पक्षाचे कार्यकर्ते व नागरिक यांच्यात समाधान व्यक्त होत आहे.

## सेवकवर्ग सहकारी पतसंस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा

**पाली : प्रतिनिधी**

सुधागड एज्युकेशन सोसायटीतील सेवकवर्ग सहकारी पतसंस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा ज. नौ. पालीवाला वरिष्ठ महाविद्यालयाच्या सभागृहात आनंदाने व उत्साहात झाली.

पतसंस्थेचे अध्यक्ष श्री वेत्रवान गुरव यांनी प्रास्ताविक केले, यात सर्व संचालक मंडळाच्या वतीने सभासदांसमोर सेवानिवृत्त होणाऱ्या सभासदाच्या कर्ज परतफेड बाबत एक सूचना सभासदांच्या समोर मांडली.

या वेळी सेवानिवृत्त सभासद शरद निकुंभ यांनी विषय मांडला की, प्रत्येक सभासद हा तीस ते बत्तीस वर्ष पतसंस्थेच्या बरोबर असतो व त्याच्या संपूर्ण जीवनात पतसंस्थेने अनेक वेळा वेगवेगळ्या परिस्थितीत संकटकाळी कर्ज देऊन सभासदाला उभे करण्याचे काम केलेले आहे, अशा सभासदाचे बोट सेवानिवृत्त झाल्यावर पतसंस्थेने लगेच सोडून देऊ नये, भविष्यात त्यालासुद्धा कर्ज उपलब्ध करून देण्यासाठी संचालक मंडळाने विचार करावा व काही कायदेशीर बदल करावे लागले तर ते करून सभासदाला आधार द्यावा यावर संचालक मंडळ त्यांच्या सभेत चर्चा करून निर्णय घेतील, असे वेत्रवान गुरव यांनी सांगितले.

सर्व साधारण सभेत सभासदांच्या उपस्थिती बाबत नेहमीप्रमाणे चर्चा करण्यात आली व उपस्थिती वाढविण्या बाबत उपाययोजना करण्या संबंधी काय करता येईल यावर चर्चा करण्यात आली.



## माथेरान दस्तुरी पार्किंगमध्ये झाड कोसळून पर्यटकांच्या वाहनांचे मोठे नुकसान

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यात सुरू असलेल्या मुसळधार पावसासह सोसाट्याच्या वाऱ्याने माथेरान येथे पुन्हा एकदा अनर्थ घडवला आहे. दस्तुरी नाक्यावरील बस स्टॉप शेजारील वाहन पार्किंगमध्ये उभ्या असलेल्या तीन चारचाकी आणि एका दुचाकीवर मोठे झाड कोसळून मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.सुदैवाने हा अपघात रात्री घडल्याने त्या ठिकाणी पर्यटक उपस्थित नव्हते, त्यामुळे मोठी जीवितहानी टळली.



कर्जत तालुक्यात मागील ४८ तासात मुसळधार पावसाने सर्वसामान्यांना झोडपून काढले असून जीवनमान विस्कळीत झाले आहे. अशातच थंड हवेचे ठिकाण असलेल्या माथेरान येथे सर्वाधिक पावसाची नोंद झालेली आहे.मुसळधार पाऊस आणि सोसाट्याचा यामुळे येथील आल्हाद दायक वातावरण येथील पर्यटकांना सुखद वाटत असले तरी येथील झाडे उन्मळून पडल्याने नागरिकांचे नुकसान झाले आहे.दरम्यान माथेरान वाहन तळ येथील पार्किंग मध्ये पार्क केलेल्या पर्यटकांच्या वाहनांवर झाड उन्मळून पडल्याने तीन चारचाकी वाहनांचे नुकसान झाले असून एका स्कुटीचे नुकसान झाले आहे.

गेल्या दीड महिन्यात अशी चौथी घटना घडली असून आतापर्यंत दहा पेक्षा जास्त वाहनांचे यामुळे नुकसान झालेले आहे त्यामुळे येथील पर्यटकांच्या वाहनांची सुरक्षा कोणाच्या भरोशावर असा प्रश्न समोर असून,पार्किंगसाठी शुल्क आकारले जाते, मग सुरक्षेची जबाबदारी प्रशासन टाळतंय का असाही प्रश्न उपस्थित करण्यात आला. पर्यटकांकडून सातत्याने शुल्क आकारूनही पार्किंग परिसरात सुरक्षा व्यवस्था नसल्याने पर्यटकांचा विश्वास डळमळीत होत आहे. वारंवार घडणाऱ्या अशा घटनांमुळे पर्यटकांचा जीव आणि मालमत्ता दोन्ही धोक्यात आहेत.

स्थानिकांच्या मते, प्रशासनाने जर वेळेवर झाडांची छाटणी, देखभाल आणि सुरक्षितता उपाययोजना केल्या असत्या तर आज एवढे नुकसान झाले नसते. त्यामुळे आता प्रशासनाने तातडीने उपाययोजना करून जबाबदारी निश्चित करावी, अशी मागणी पर्यटक आणि स्थानिक नागरिकांकडून होत आहे.

## खासदार सुनील तटकरे यांना भारत भुषण पुरस्कार; नागोठणे राष्ट्रवादीकडून अभिनंदन

**नागोठणे : बातमीदार**

रायगडचे कर्तव्यदक्ष खासदार सुनील तटकरे यांनी आमदार, खासदार व मंत्रीपदाचा कालावधीत जनसामान्यांना मूलभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या. महाराष्ट्र राज्याच्या मंत्रिमंडळात असताना खा. तटकरे यांनी जलसंपदा व अर्थ मंत्री या सारखी महत्वपूर्ण खाती जबाबदारीने सांभाळली. आपल्या निधीचे योग्य नियोजन करून योग्य वापर केला.

रायगड लोकसभा मतदार संघांचे दुसऱ्यांदा खासदारपद सांभाळताना खा. तटकरे हे शेतकरी, महिला, मासेमारी करणारे व वंचित वर्गाचे सशक्तिकरण करण्यासाठी निरंतर कार्यरत राहिले आहेत. खासदार सुनील तटकरे यांच्या कार्याची लोकमत उद्योग समूहाने दखल घरून खासदार सुनील तटकरे यांना लंडन येथे भारत भुषण पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला.

या अनुषंगाने नागोठणे विभाग राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते भाईसाहेब टके यांच्या निवासस्थानी मंगळवारी सायंकाळी नागोठणे शहर व विभाग राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने प्रमुख कार्यकर्त्यांची बैठक घेऊन खासदार सुनील तटकरे यांचा अभिनंदनाचा ठराव पारित करण्यात आला.

या बैठकीला राष्ट्रवादीचे नेते भाईसाहेब टके, रायगड जिल्हा नियोजन सहनियंत्रक (दिशा) समितीचे सदस्य शिवरामभाऊ शिंदे, हरीशशेठ काळे, डॉ. राजेंद्र धात्रक, विलास चौलकर, नागोठणे विभाग अध्यक्ष संतोष कोळी, शहर अध्यक्ष बाळासाहेब टके, राजेंद्र शिंदे, प्रमोद जांबेकर, बिपीन सोष्टे, सखाराम ताडकर, मनोज टके, आदी प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते.



## सुधागडातील १४ शाळांना शैक्षणिक साहित्य वाटप




**पाली: प्रतिनिधी**

संत नामदेव माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय नांदगाव येथे सुधागड तालुका रहिवाशी सेवा संघ ठाणे व टाटा कॅपिटल लिमिटेड आयोजित विविध शैक्षणिक व क्रीडा साहित्य वाटप समारंभ तालुका संघांचे अध्यक्ष विठ्ठल घाडगे यांचे अध्यक्षतेखाली झाला. समारंभाचे औचित्य साधून सुरेशशेठ खैरे यांची कोकण विभागातून पश्चिम महाराष्ट्र सहकारी बोर्डाच्या संचालकपदी बिनविरोध निवड झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला

यावेळी लाँग नोट बुक्स, क्रिकेट किट्स, हॉलीबॉल किट्स, लेझीम, फुटबॉल इत्यादी शैक्षणिक व क्रीडा साहित्य शाळेच्या मुख्याध्यापक यांच्याकडे सुपूर्द करण्यांत आले. तसेच संस्थेचे समन्वयक बळीराम निंबाळकर यांनी आपल्या प्रास्ताविकात जून महिन्यात पूर्व-वाटप केलेल्या इ. ९ वी व १० वी. तील विद्यार्थ्यांसाठी क्रमिक पुस्तके,ई लर्निंग सेट, वाचनालयासाठी ऑफिस कपाटे शाळेच्या मागणीनुसार वाटप करण्यात आले. संस्थेच्या माध्यमातून १४ माध्यमिक शाळेत संस्था करीत असलेल्या कार्याचा आढावा सांगितला.

कार्यक्रमास संस्थेचे माजी अध्यक्ष विठ्ठल खेरटकर , सल्लागार सुरेश शिंदे, शिक्षण समिती प्रमुख अनिल सागळे, कार्याध्यक्ष प्रकाश शिलकर, चिटणीस अविकांत साळुंके, जेष्ठ सदस्य भगवान तेलंगे, उपस्थित होते.

## केवळ दैव बलवत्तर म्हणून विवेक कदम यांचा जीव वाचला

**चौक : प्रतिनिधी**

वावंढळ हद्दीत असणाऱ्या वृंदावन सोसायटीत विवेक विलास कदम हे आपल्या गाडीतून जात असताना सोसायटीतील कृष्ण कुंज या बंगल्या शेजारी आले असता चालू वीज वाहिनी गाडीच्या समोर तुटून पडली.त्यांच्या गाडीची गती कमी असल्याने गाडी जागीच थांबवली. अन्यथा एक जीव वीज वितरण कंपनीच्या हलगर्जीपणा मुळे गेला असता,

नुकताच जांभिवली येथे एका महिलेचा वीज वाहिनी अंगावर पडून मृत्यू झाला आहे. ही घटना ताजी असताना हा प्रकार घडला असल्याने लोकांच्या संतापात आणखी भर पडली आहे.वीज वितरण कंपनींचे कर्मचारी यांचे पूर्णपणे दुर्लक्ष असल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते दिनेश महाडिक यांनी केला आहे. जुनाट जीर्ण झालेल्या विद्युत वाहिनी जोरदार वारा आणि पाऊस यामुळे तुटतात, याची वारंवार तक्रार करून देखील वीज वितरण कंपनीने दुर्लक्ष केल्याने असे प्रकार घडत आहेत,

ही घटना वीज वितरण कंपनीला कळविली त्यांनी वीज पुरवठा खंडित करून पुढील काम केले. विशेष बाब म्हणजे दोन खांबांच्या मधील विद्युत वाहिन्यांना जोड दिले आहेत, त्यामुळे या वाहिन्या आणखी कमजोर होऊ न गेल्या आहेत.

## सुदर्शन केमिकल अंतर्गत ई-लर्निंग माध्यमातून ग्रामस्थांना नवीन दिशा

**धाटाव : प्रतिनिधी**

ग्रुप ग्रामपंचायत खांब येथे रक्तदान शिबिर व सामाजिक सुरक्षा आणि अर्थसहाय्य योजना बारकोड तसेच ई-लर्निंग या उपक्रमांचे भव्य उद्घाटन उत्साहात पार पडले.



सुदर्शन केमिकल कंपनीच्या सी.एस.आर. विभागाच्या प्रमुख माधुरी सणस यांच्या संकल्पनेतून सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या या अभिनव उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. ग्रामीण भागातील नागरिकांना सामाजिक सुरक्षा योजना व अर्थसहाय्याच्या विशेष माहितीचा लाभ तंत्रज्ञानाच्या माध्यमातून सहजपणे मिळावा, यासाठी बारकोडद्वारे योजना माहिती उपलब्ध करून देण्याचा उपक्रम राबविण्यात येत आहे. तसेच विद्यार्थ्यांसाठी डिजिटल साक्षरता निर्माण व्हावी, त्यांना आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख व्हावी या उद्देशाने ई-लर्निंग प्रणालीची सुरुवात करण्यात आली.

या प्रसंगी आयोजित रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. एकूण ५० जणांनी रक्तदान करून समाजाप्रती आपली बांधिलकी व्यक्त केली. विशेष उल्लेखनीय म्हणजे, या उपक्रमात महिलांनीही मोठ्या प्रमाणात व उत्स्फूर्तपणे सहभाग घेत समाजासाठी प्रेरणादायी उदाहरण निर्माण केले. तसेच तरुण वर्गाने विशेषपणे रक्तदानासाठी पुढाकार घेत जबाबदारीची जाणीव दाखवून दिली. रक्त संकलनाची प्रक्रिया जिल्हा रुग्णालयाच्या पथकाच्या मार्फत पार पडली.

# महाराजच्या फिरकीपुढे ऑस्ट्रेलियाचे लोटांगण!

## पहिल्या वनडेत द. आफ्रिकेचा ९८ धावांनी दणदणीत विजय

**केर्न्स : वृत्तसंस्था**

डावखुरा फिरकी गोलंदाज केशव महाराजच्या भेदक गोलंदाजीच्या जोरावर द. आफ्रिकेने विश्वविजेत्या ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या तीन एकदिवसीय सामन्यांच्या मालिकेत विजयी सलामी दिली आहे. केर्न्स येथील कॅझलीज स्टेडियमवर झालेल्या पहिल्या सामन्यात, टेंबा बावुमाच्या संघाने ऑस्ट्रेलियाचा ९८ धावांच्या मोठ्या फरकाने पराभव करत मालिकेत १-० अशी आघाडी घेतली.

प्रथम फलंदाजी करताना द. आफ्रिकेने ८ गडी गमावून २९६ धावांचा डोंगर उभारला. कांगारूंनी जवळजवळ जिंकलेला सामना गमावला. २९७ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना ऑस्ट्रेलियाने चांगली सुरुवात केली. ऑस्ट्रेलियाने एकही विकेट न गमावता फक्त ७ षटकांत ६० धावा केल्या. परंतु त्यानंतर ऑस्ट्रेलियाने २९ धावांच्या आत एकामागून एक ६ विकेट गमावल्या आणि ४१व्या षटकातच संपूर्ण संघ १९८ धावांवर तंबूत परतला. अशाप्रकारे त्यांनी सामना ९८ धावांनी गमावला. यासह द. आफ्रिकेने तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेत १-० अशी आघाडी घेतली आहे.



द. आफ्रिकेच्या या विजयाचा शिल्पकार डावखुरा फिरकी गोलंदाज केशव महाराज ठरला. त्याने आपल्या वनडे कारकिर्दीत प्रथमच पाच बळी मिळवण्याचा पराक्रम केला. महाराजने १० षटकांत केवळ ३३ धावा देत ५ महत्त्वपूर्ण बळी घेतले. यात मार्नस लाबुशेन, कॅमेरॉन ग्रीन, जोश इंग्लिस, लेक्स कॅरी आणि रॉन हार्डी यांना पॅव्हेलियनचा रस्ता दाखवला. विशेष म्हणजे, यापैकी एकाही फलंदाजाला दुहेरी धावसंख्या गाठता आली नाही.

ऑस्ट्रेलियाने ६० धावांवर पहिली विकेट गमावली होती, मात्र ८९ धावांपर्यंत पोहोचताना त्यांचे ६ फलंदाज तंबूत परतल्याने संघाचा डाव गडगडला. कर्णधार मिचेल मार्शने एकाकी झुंज देत ८८ धावांची खेळी केली. आठव्या क्रमांकावर फलंदाजीस आलेल्या बेन ड्वारशुइससोबत त्यांनी सातव्या गड्यासाठी ७१ धावांची महत्त्वपूर्ण भागीदारी रचली. ड्वारशुइसनेही ७१ धावांचे योगदान दिले. १७४ धावांवर मार्श बाद होताच ऑस्ट्रेलियाचा पराभव निश्चित झाला. अखेरीस ४०.५ षटकांत ऑस्ट्रेलियाचा संघ १९८ धावांवर सर्वबाद झाला. नांद्रे बर्गर आणि लुंगी एन्गिडी यांनी प्रत्येकी २ बळी घेतले.

तत्पूर्वी, टॉस गमावून प्रथम फलंदाजी करताना द. आफ्रिकेने दमदार सुरुवात केली. त्यांच्या आघाडीच्या फळीने उत्कृष्ट फलंदाजी केली. सलामीवीर एडन मार्करम आणि रायन रिकेल्टन यांनी पहिल्या गड्यासाठी ९२ धावांची भक्कम सलामी दिली. रिकेल्टन (३३) बाद झाल्यानंतर कर्णधार बावुमा यांनी मार्करमची साथ दिली. मार्करमने ८२ धावांची शानदार खेळी केली. चौथ्या क्रमांकावर आलेल्या मॅथ्यू ब्रीट्झकेनेही अर्धशतक झळकावले. ब्रीट्झकेने ४०व्या षटकात ५६ चेंडूंवर ५७ धावा करून तो बाद झाला. ४१व्या षटकात ट्रेव्हिस हेडने ट्रिस्टन स्टब्स आणि डेवाल्ड ब्रेविस यांचे बळी घेत दक्षिण आफ्रिकेला धक्का दिला.

शेवटच्या षटकांमध्ये वियान मुल्डरने २६ चेंडूंत नाबाद ३१ धावांची खेळी करत संघाला २९६ धावांपर्यंत पोहोचवले. कर्णधार बावुमाने ६५ धावांचे महत्त्वपूर्ण योगदान दिले. ऑस्ट्रेलियाकडून पार्ट टाईम गोलंदाज ट्रेव्हिस हेडने सर्वाधिक ४ बळी मिळवले.

### ३१ वर्षे जुना स्वत:चाच विक्रम मोडला

एकदिवसीय क्रिकेटमध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्ध आफ्रिकेचा हा धावांच्या बाबतीत सर्वात मोठा विजय आहे. यापूर्वी १९९४ मध्ये आफ्रिकेने ऑस्ट्रेलियाविरुद्ध ८२ धावांनी विजय मिळवला होता. आता आफ्रिकेने तो विक्रम मोडीत काढला आहे.

# महाराष्ट्राकडून खेळताना पृथ्वी शॉचे शानदार शतक

**चेन्नई : वृत्तसंस्था**

देशांतर्गत क्रिकेटमध्ये मुंबईची साथ सोडून महाराष्ट्र संघाचा हात धरणाऱ्या पृथ्वी शॉ याने करिअरची नवी आस निर्माण करणारी खेळी केलीये. बुची बाबू करंडक स्पर्धेतील महाराष्ट्र संघाकडून खेळताना पहिल्याच डावात त्याने शतकी खेळी केली. छत्तीसगडविरुद्धच्या सामन्यात २५ वर्षीय सलामीवीराने कडक बॅटिंगचा नजराणा पेश करताना १२२ चेंडूत शतक साजरे केले.

छत्तीसगडच्या संघाचा डाव २५२ धावांवर आटोपल्यावर महाराष्ट्र संघाकडून पृथ्वीने दमदार खेळी केली. महाराष्ट्र संघाच्या डावाची सुरुवात करताना पहिल्या डावातील ४४व्या षटकात त्याने तीन आकडी धावसंख्या गाठली. त्याची ही खेळी १४ चौकार आणि सहा षटकारांनी सजलेली होती. दुसऱ्या बाजूला या संघातील आणखी एक स्टार ऋतुराज गायकवाड मात्र सपशेल अपयशी ठरला. संघाच्या धावसंख्येत फक्त एका धावेची भर घातली. तो स्वस्तात माघारी फिरल्यामुळे पृथ्वीच्या शतकानंतरही महाराष्ट्र संघ पिछाडीवर राहिला.



पृथ्वी शॉने १४१ चेंडूत १११ धावांची खेळी केली. त्याच्याशिवाय सौरभ नवाळे याने १०१ चेंडूत नाबाद ५० धावांची खेळी साकारली. या दोघांच्या खेळीनंतर दुसऱ्या दिवसाअखेर महाराष्ट्र संघाचा पहिला डाव ७३ षटकात २१७ धावांवर आटोपला. छत्तीसगड संघाने पहिल्या डावात ७८ धावांची आघाडी घेतली आहे.


कारकिर्दीत अडचणीत असताना पृथ्वीने मुंबईचा संघ सोडून महाराष्ट्र संघाकडून खेळण्याचा निर्णय घेतला अन् आता त्याच्या भात्यातून शतकी खेळी आली आहे. महाराष्ट्र संघाकडून पदार्पणातील त्याची ही खेळी टायगर अभी जिंदा है... हा ट्रेलर दाखवणारी असली तरी पिक्चर अभी बाकी आहे, कारण सातत्य टिकवण्याचे आव्हान त्याच्यासमोर असेल.

# सिंकेफिल्ड चषक बुद्धिबळ स्पर्धेत प्रज्ञानंदचा गुकेशवर विजय

**सेंट लुइस : वृत्तसंस्था**

ग्रँडमास्टर आर. प्रज्ञानंदने सिंकेफिल्ड चषक बुद्धिबळ स्पर्धेची दमदार सुरुवात करताना पहिल्या फेरीत भारतीय सहकारी जगज्जेत्या दोम्माराजू गुकेशवर मात केली. या कामगिरीसह त्याने 'लाइव्ह रेटिंग'च्या क्रमवारीत तिसऱ्या स्थानी झेप घेतली.

अमेरिकेच्या सेंट लुइस येथे सुरू झालेल्या या स्पर्धेत यजमान देशाच्या लेव्हॉन अरोनियनने उझबेकिस्तानच्या नोदिरबेक अब्दुसत्तोरोवचा पराभव केला. त्यामुळे पहिल्या फेरीनंतर प्रज्ञानंद आणि अरोनियन संयुक्तपणे आघाडीवर होते. अन्य लढतींत अमेरिकेचा फॅबियानो कारुआना आणि पोलंडचा यान-क्रिस्टोफ डुडा, अमेरिकेचे सॅम्युएल



सॅव्हिएन आणि वेस्ली सो, फ्रान्सचे मॅक्सिम व्हॅचिएर-लाग्रेव्ह आणि अलिरेझा फिरुझा यांच्यात बरोबरी झाली.

गुकेशविरुद्ध पांढऱ्या मोहऱ्यांनी खेळताना प्रज्ञानंदने चमक दाखवली. गुकेशने सुरुवातीलाच चाली रचण्यासाठी वेळ घेतला. त्याने वजिराची अदलाबदल करण्याच्या दृष्टीने पावले उचलली, मात्र प्रज्ञानंदकडे उंटाचे दोन्ही मोहरे शाबूत असल्याने तो भक्कम स्थितीत राहिला.

त्यानंतर गुकेशला वेळेचे गणित साधणे अवघड जाऊ लागले. दुसरीकडे प्रज्ञानंदने झटपट चाली रचून प्रतिस्पर्ध्यावर दडपण राखले. अवघड स्थितीतून गुकेशला मार्ग काढता आला नाही आणि अखेरीस ३६ चालींनंतर त्याने हार मान्य केली.

**आज नक्की काय झाले ते समजले नाही. गुकेश बहुधा लक्षपूर्वक खेळला नाही. गेल्या वर्षी, मी त्याच्याविरुद्ध विजयाची संधी दवडली होती. पारंपरिक प्रकारात (क्लासिकल) मी जवळपास दोन वर्षांपासून गुकेशला हरवू शकलो नव्हतो. त्यामुळे हा विजय खूप खास आहे.**

**-आर. प्रज्ञानंद**

# रायगड जिल्हांतर्गत बास्केटबॉल स्पर्धा आणि जिल्हा बास्केटबॉल निवड चाचणी

**पनवेल : वार्ताहर**

बास्केटबॉल असोसिएशन ऑफ रायगड यांच्या वतीने १३ वर्षाखालील मुले व मुली यांच्यासाठी रायगड जिल्हांतर्गत बास्केटबॉल स्पर्धा व जिल्हा निवड चाचणीचे आयोजन मुलांकरिता शनिवार २३ ऑगस्ट २०२५ व मुलीं करिता रविवार, दिनांक २४ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ७.३० वाजता विबग्योर शाळा, सेक्टर १५ , खारघर येथे करण्यात येत आहे.

या निवड चाचणीतून निवडलेला संघ दिनांक ११ सप्टेंबर ते १६ सप्टेंबर २०२५ दरम्यान सोलापूर, येथे आयोजित होणाऱ्या १३ वर्षाखालील महाराष्ट्र राज्यस्तरीय बास्केटबॉल स्पर्धेत रायगड जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करेल. रायगड जिल्ह्यातील सर्व बास्केटबॉल खेळाडूंना या निवड चाचणीत मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन करण्यात येत आहे. खेळाडूंनी निवड चाचणीसाठी येताना दोन पासपोर्ट आकाराचे फोटो, वयाचा पुरावा (जन्म प्रमाणपत्र) आणि निवासाचा पुरावा (आधार कार्ड किंवा समकक्ष कागदपत्र) सोबत आणणे बंधनकारक आहे. रायगड जिल्ह्यातील बास्केटबॉल प्रेमींसाठी



ही अत्यंत आनंदाची गोष्ट आहे की, बास्केटबॉल असोसिएशन ऑफ रायगड यांच्या वतीने १३ वर्षाखालील मुला-मुलींसाठी जिल्हास्तरीय स्पर्धा व निवड चाचणीचे आयोजन खारघर येथे करण्यात येत आहे.

या माध्यमातून जिल्ह्यातील प्रतिभावान खेळाडूंना स्वतःला सिद्ध करण्याची व पुढे राज्यस्तरावर चमक दाखविण्याची संधी मिळणार आहे. सर्व युवा खेळाडूंनी या स्पर्धेत उत्साहाने सहभाग घ्यावा, असे आवाहन आमदार विक्रांत दादा पाटील उपाध्यक्ष, महाराष्ट्र बास्केटबॉल संघटना अध्यक्ष, बास्केटबॉल असोसिएशन ऑफ रायगड यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी खेळाडूंनी मंदार म्हात्रे (+९१ ८८५०८ ००२९९) व आकाश चाकणे (संपर्क: ९०२९५९६९४९) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# ट्वेन्टी-२० संघातून वगळल्यानंतर बाबर, रिझवानला आणखी एक धक्का

**कराची : वृत्तसंस्था**

आशिया चषक स्पर्धेसाठी ट्वेन्टी-२० संघातून वगळण्यात आलेल्या बाबर आझम आणि मोहम्मद रिझवान या अनुभवी फलंदाजांना पाकिस्तान क्रिकेट मंडळाने (पीसीबी) आणखी एक धक्का दिला आहे. 'पीसीबी'च्या वार्षिक कराराच्या यादीत या दोघांची 'ब' श्रेणीत पदावनती करण्यात आली आहे.



### 'पीसीबी'च्या वार्षिक करारात पदावनती

'पीसीबी'ला सर्वोच्च 'अ' श्रेणीत स्थान देण्यायोग्य एकही खेळाडू वाटला नाही. वार्षिक कराराच्या यादीत एकूण ३० खेळाडूंना स्थान देण्यात आले असून त्यांची 'ब', 'क' आणि 'ड' श्रेणीत विभागणी करण्यात आली आहे. त्यांच्याशी किती रकमेचा करार करण्यात आला हे मात्र स्पष्ट करण्यात आलेले नाही.

'आयसीसी'च्या स्पर्धांत निराशाजनक कामगिरी केल्याचा बाबर आणि रिझवान यांना फटका बसला आहे. गेल्या वर्षीची ट्वेन्टी-२० विश्वचषक स्पर्धा तसेच या वर्षी मायदेशात झालेली चॅम्पियन्स करंडक स्पर्धा यात बाबर आणि रिझवानला अपयश आले. याचा विपरित परिणाम पाकिस्तान संघाच्या कामगिरीवरही झाला. त्यामुळेच एकदिवसीय संघाचा कर्णधार असूनही रिझवानला 'अ' श्रेणीतील स्थान राखता आले नाही.

ट्वेन्टी-२० संघाचा कर्णधार सलमान अली आघाला 'क' श्रेणीतून 'ब'मध्ये बढती मिळाली. यंदा १२ नव्या खेळाडूंना वार्षिक कराराच्या यादीत स्थान मिळाले, तर गेल्या वर्षीच्या यादीतून आठ जणांना वगळण्यात आले. 'ब' श्रेणीत बाबर, रिझवान, आघा यांच्यासह अबरार अहमद, फखर झमान, हारिस रौफ, हसन अली, सैम अयुब, शादाब खान आणि शाहीन शाह आफ्रिदी यांचा समावेश आहे.

# श्रेयस अय्यरला संधीची वाट पाहावी लागेल -आगरकर

**मुंबई : प्रतिनिधी**

आशिया चषक २०२५साठी भारतीय क्रिकेट संघाची घोषणा झाली आहे. धक्कादायक बाब म्हणजे चॅम्पियन्स ट्रॉफी विजेतेपदाचा स्टार खेळाडू श्रेयस अय्यरला १५ सदस्यीय मुख्य संघात स्थान मिळालेले नाही तसेच राखीव खेळाडूंच्या यादीतही त्याचा समावेश नाही. हा निर्णय क्रिकेट चाहत्यांसाठी आश्चर्यकारक ठरला आहे.

अय्यरची अलीकडील कामगिरी उत्कृष्ट राहिलेली आहे, पण तरीही त्याला वगळण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर भारतीय संघाचे मुख्य निवडकर्ता अजित आगरकर यांनी पत्रकार परिषदेदरम्यान श्रेयसची निवड न करण्यामागील कारण स्पष्ट केले आहे.




श्रेयसने अलीकडेच दुबईत खेळवण्यात आलेल्या चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेच्या सामन्यांत अय्यरने भारतीय संघासाठी महत्त्वाची भूमिका बजावली होती. त्या स्पर्धेत तो भारतासाठी सर्वाधिक धावा करणारा फलंदाज होता आणि संघाला विजेतेपद मिळवून देण्यात त्याने मोलाचा वाटा उचलला होता. या कामगिरीनंतरही आशिया चषक २०२५साठी त्याच्याकडे दुर्लक्ष केल्याने अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत.

आयपीएल २०२५मध्ये पंजाब किंग्सचे नेतृत्व करत आपल्या संघाला अंतिम फेरीपर्यंत पोहचवले. या हंगामात त्याने फलंदाजीमध्येही उत्कृष्ट कामगिरी केली. तो आपल्या संघासाठी सर्वाधिक धावा करणारा खेळाडू ठरला होता. त्याने १७ सामन्यांमध्ये ५०.३३च्या सरासरीने ६०४ धावा फटकावल्या.

यावर भारतीय संघाचे मुख्य निवडकर्ता अजित आगरकर यांनी यशस्वी जैस्वाल आणि श्रेयस अय्यरला संघात समाविष्ट न करण्याचे कारण स्पष्ट केले. ते म्हणाले, अभिषेक शर्माने त्याचे काम कसे केले आहे ते तुम्ही पाहता आणि तो गोलंदाजीदेखील करू शकतो, म्हणून यशस्वीला वाट पहावी लागेल. श्रेयस अय्यरच्या बाबतीतही असेच आहे. यामध्ये त्याची काहीही चूक नाही आणि आमचीही नाही. आम्हाला फक्त १५ खेळाडू निवडण्याची संधी मिळाली होती. जर जागा असती तर आम्ही निश्चितच श्रेयसला संघाचा भाग बनवले असते. त्याला संधीची वाट पाहावी लागेल.

आगरकर यांच्या या वक्तव्यावरून हे स्पष्ट होते की, निवड समितीने एका वेगळ्या रणनितीसाठी हा कठीण निर्णय घेतला आहे, परंतु अय्यरच्या प्रतिभेवर आणि योगदानावर कोणतेही प्रश्नचिन्ह उपस्थित केलेले नाही.

उल्लेखनीय आहे की, श्रेयस अय्यरने भारतीय संघासाठी आतापर्यंत ५१ टी-२० सामने खेळले आहेत, ज्यात त्याने ३०.६६च्या सरासरीने ११०४ धावा केल्या आहेत, मात्र त्याने भारतासाठी शेवटचा टी-२० सामना २०२३ साली खेळला होता. तेव्हापासून तो संघात आपले स्थान मिळवण्यासाठी संघर्ष करत आहे. त्याला २०२४च्या टी-२० विश्वचषक संघातही स्थान मिळवता आले नव्हते आणि आता आशिया चषक संघातही स्थान मिळवण्यात तो अपयशी ठरला आहे.

# अर्जुन तेंडुलकरची तुफानी बॅटिंग | २५८ च्या स्ट्राइक रेटने फटकेबाजी

**मुंबई : प्रतिनिधी**

अर्जुन तेंडुलकरच नाव तुम्ही ऐकलं असेल. हा तोच, जो सचिन तेंडुलकरचा मुलगा आहे. नुकताच अर्जुन तेंडुलकरचा सानिया चंडोक सोबत साखरपुडा झाला. पण आम्ही इथे त्या अर्जुन तेंडुलकरबद्दल बोलत नाहीय. आम्ही पी. अर्जुन तेंडुलकरबद्दल बोलतोय. नाव भले एकसमान असेल, पण हे दोन्ही वेगवेगळे खेळाडू आहेत. आम्ही ज्या पी. अर्जुन तेंडुलकरबद्दल बोलतोय, तो सध्या आंध्र प्रीमियर लीगमध्ये खेळतोय. सचिनचा मुलगा अर्जुन प्रमाणे तो ऑलराऊंडर नाही, तर एक ओपनर आहे. दोघांमध्ये एकच समानता आहे, ते म्हणजे दोघे लेफ्टी फलंदाजी करतात. १९ ऑगस्ट २०२५ रोजी -झङ चा सामना झाला. त्यात पी. अर्जुन तेंडुलकरने ओपनिंगला येत प्रतिस्पर्धी टीमच्या गोलंदाजांची जोरदार धुलाई केली.

आंध्र प्रीमियर लीगमध्ये १९ ऑगस्ट रोजी काकिंदा किंग्स आणि भीमावरम बुल्स मध्ये सामना झाला. भीमावरम बुल्सने प्रथम फलंदाजी केली. त्यांनी २० ओव्हर्समध्ये ६ विकेटवर



२१४ धावा केल्या. २१५ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करायला काकिंद किंग्सची टीम मैदानात उतरली, त्यावेळी त्यांना धमाकेदार ओपनिंगची आवश्यकता होती. पी. अर्जुन तेंडुलकरने ही भूमिका चोख बजावली.

२० वर्षाच्या पी. अर्जुन तेंडुलकरने ओपनिंगला येत तुफानी फटकेबाजी केली. चौकार-षटकारांचा पाऊस पाडला. त्याने जितके सिक्स मारले, तितकचे फोरही ठोकले. त्याने आपल्या इनिंगमध्ये ५० टक्के चेंडू सीमारेषेबाहेर पाठवले. २५८ च्या स्ट्राइक रेटने धावा ठोकल्या. तेंडुलकर आडनाव असलेल्या या अर्जुनने काकिंदा किंग्सकडून सलामीला येत फक्त १२ चेंडू खेळला. यात त्याने ३ सिक्स आणि ३ फोर मारले.

पी. अर्जुन तेंडुलकरने स्फोटक फलंदाजीचा नजराणा पेश केला.काकिंग किंग्सच्या स्कोर बोर्डवर ३२ धावा असताना पहिला विकेट गेला. यात ३१ धावा एकट्या अर्जुनच्या होत्या. अर्जुन तेंडुलकर इनिंगच्या १३ व्या चेंडूवर आऊट झाला. खझङ मध्ये मुंबई इंडियन्सकडून खेळणारा गोलंदाज सत्यनारायण राजूने त्याला आऊट केलं. २६ वर्षाच्या राजूने यावर्षी आयपीएलमध्ये मुंबई इंडियन्सकडून डेब्यु केलेला. तो मीडियम पेस गोलंदाजी करतो. याचवर्षी डेब्यु करताना त्याने दोन सामन्यात एक विकेट काढला. अर्जुन तेंडुलकरने तुफानी स्टार्ट दिली. पण तरीही टीम विजयाचा उंबरठा ओलांडू शकली नाही. भीमवरम बुल्सने त्यांना २७ धावांनी हरवलं.

# शुभमनला लागली लॉटरी, पण पटेलसोबत मोठा गेम

**नवी दिल्ली :** आशिया चषक २०२५ स्पर्धेसाठी भारतीय संघाची नुकतीच घोषणा करण्यात आली. भारतीय संघात समावेश केलेल्या तसेच संघाच्या बाहेर ठेवण्यात आलेल्या खेळाडूंची नावे समोर आल्यानंतर काही क्रिकेट रसिकांनी आनंद व्यक्त केला तर काही लोकांनी बीसीसीआयवर टीकेची झोड उठवली.

आशिया चषकासाठीच्या भारतीय संघात शुभमन गिला उपकर्णधारपदाची जबाबदारी देण्यात आली आहे. तर भारताचा स्टार फलंदाज श्रेयस अय्यर याला मात्र संघात स्थान देण्यात आलेलं नाही. त्यामुले श्रेयसचे चाहते चांगलेच नाराज आहेत. दरम्यान, आता शुभमन गिलला उपकर्णधारपदाची जबाबदारी कशी मिळाली, याबाबतची इनसाईड स्टोरी समोर आली आहे. याआधी भारताच्या टी-२० संघाच्या उपकर्णधारपदाची जबाबदारी अक्षर पटेल याच्याकडे असायची. आता मात्र शुभमन गिलची टी-२० संघात एन्ट्री झाली असून अक्षर पटेलचे उपकर्णधारपद गिलला देण्यात आले आहे. श्रेयस अय्यरला तर संघाच्या बाहेरच ठेवण्यात आले आहे.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com